
# ाईलीला

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे अधिकृत मासिक



ानेवारी १९८१ ]

श्रीबाबांचे गुरुस्थान

[ किं. १ रु.

श्री साईबाबा संस्थान, शिर्डी.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

**श्रीसाई वाक्सुधा**

५९ वे )        किंमत एक रुपया        ( अंक १० वा

: कार्यालय :
' साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.
दूरध्वनी : ४४३३६१
वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

संत मुळींच गर्भातीत ।
परोपकारार्थ प्रकट होत ।
ब्रह्मस्वरुप मूर्तिमंत ।
भाग्यवंत अवतरती ॥७५॥

जन्म आणि मरणस्थितीं ।
अवतारी या कदा न येती ।
कार्य सरतां ते स्वरूपीं मिळती ।
समरसती ते अव्यक्तीं ॥७६॥

अवघा देह साडेतीन हात ।
बाबा काय त्यांतचि समात ।
ते विशिष्ट वर्णस्वरुप युक्त ।
हें तो अयुक्त बोलणें ॥७७॥

अणिमा–गरिमादि अष्टसिद्धी ।
आलिया गेलिया क्षय ना वृद्धी ।
स्वयेंचि अखंड जयाची समृद्धी ।
ऐसी प्रसिद्धि तयांची ॥७८॥

ऐसिया महानुभवांचा उदय ।
लोक कल्याण हाचि आशय ।
उदयासी आहे स्थिति विलय ।
लोक संग्रहमय संत ॥७९॥

—श्रीसाईसच्चरित–अध्याय ४३ वा

# नूतन वर्षाभिनंदन

ख्रिस्ती शताब्दी प्रमाणे
सुरू होणारे हे नूतन वर्ष
सर्वांना सुखाचे, आनंदाचे
आणि भरभराटीचे जावो.

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. संपादकीय | — संतांचे चमत्कार |
| २. श्री सद्गुरूंच्या शोधात | — श्री. महादेव भिडे |
| ३. गुर्वाज्ञा पालन हाच खरा धर्म | — प्रा. र. श्री. पुजारी |
| ४. श्री साईनाथ महिम्नस्तोत्र | — ले. कर्नल मु. बा. निंबाळकर |
| ५. भक्तिमार्गातील उत्तुंगतेचे महापर्व | — श्री. सुधाकर सामंत |
| ६. शिरडी, शृंगेरी, शेगाव–त्रिवेणी संगम | — डॉ. अ. का. पाठक |
| ७. मुंबईची श्री महालक्ष्मी | — श्री. गणपतराव सामंत |
| ८. बाबांचा विनोद प्रचुर उपदेश | — डॉ. रा. सी. कापडी |
| ९. श्री साई सुधा | — श्री बाळकृष्ण अ. देसाई |
| १०. सा विद्याया विमुक्त ये | — डॉ. अनिल जायस्वाल |
| ११. बिट्टू बरा झाला | — श्री. उदय पार्सेकर |
| १२. श्रद्धा आणि सबूरी | — श्री ज. ना. कुळकर्णी |
| १३. हे दिनानाथ तुझा अवतार अंतरंगी | — श्री. निशिकांत पेडणेकर |
| १४. राधाकृष्ण स्वामीजींची प्रथम पुण्यतिथी | — |
| १५. जाधव मास्तरांची कलाकृती | — |
| १६. साई धामची नूतन श्रीसाई मूर्ती | — |
| १७. शिरडी वृत्त | — ऑक्टोबर ८० |
| १८. पुस्तक परीक्षण | — |

संपादकीय —

# संतांचे चमत्कार

स. न. वि. वि.

श्रीसाईबाबांच्या चमत्काराविषयी अनेक कथा प्रचलीत आहेत. त्यांना कथाच म्हटल्या पाहिजेत; कारण साईबाबांनी प्रत्यक्ष काहीतरी अघटित चमत्कार करून दाखविले. चमत्कारांवर विश्वास ठेवावयाचा किंवा नाही हा ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा भक्तिभावाचा प्रश्न आहे. देवावर, म्हणजेच परमेश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवा-यचा असेल तर कुठल्यातरी स्वरूपाच्या चमत्कारावर विश्वास ठेवावाच लागतो. नास्तिक, अश्रद्ध माणसाला ते सारे थोतांड वाटते. परंतु आस्तिक मनाला परमेश्वराचे सर्वाभूती अस्तित्व हाच एक मोठा चमत्कार वाटत असतो. जे दिसत नाही; पण जे सर्वत्र भरले आहे आणि त्याच्या प्रेरणेनेच साऱ्या विश्वाचा कारभार चालू आहे, त्या दिव्य नि भव्य अज्ञात शक्तीच्या चमत्काराचे पडताळे पदोपदी पाहावयास सापडतात या चमत्काराचे कोडे सामान्य माणसाला उलगडू शकत नाही आणि म्हणूनच तो भांबावून जातो नि ते खरे की खोटे असा संभ्रम निर्माण होतो.

अशाच प्रकारचा संभ्रम आज साईबाबांच्या चमत्कारांविषयीं अनेकांच्या मनात निर्माण झाला आहे. वास्तविक हे चमत्कार तरी आहेत कसले ! ज्याचा त्याचा पड-ताळा हेच या चमत्काराचे मूळ आहे. भाव तसा देव या तत्वानुसार जो ज्या भाव-नेने साईबाबांच्या दर्शनास जातो, त्याचप्रमाणे त्याला प्रचीती येत असते. त्यातच तो आपल्या मनाचा पडताळा पहात असतो आणि त्याचीच संगती तो आपल्या जीवनध्येयाशी निगडीत करीत असतो. इच्छा तसे फळ भक्तीभावात असते आणि म्हणूनच जो जो जे जे वांछील ते ते त्यास लाभते असा शिरडीच्या बाबतीत एक संकेतच ठरून गेला आहे. अर्थात्‌च आपली मनीषा परिपूर्ण झाली, अथवा मनकामना फळास आली अशी श्रद्धा निर्माण झाल्यामुळेच त्यातून या चमत्कारांचा उगम झाला आहे. ज्याला ज्याला जे जे काही हवे, ते ते त्याला लाभो असे संतवचनच आहे. तेव्हा शिरडीला जाऊन आल्यापासून आम्हाला काहीतरी लाभ झाला असे सांगणा-ऱ्यांची संख्या हल्ली मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहे. शिरडीला आज तीर्थक्षेत्राचे स्वरूप प्राप्त झाले आहे. काही नाही तरी तिथे गेल्यानंतर मनाला प्रसन्न वाटले असे म्हणणारेही काही कमी नाहीत ! आणि हाही लाभ काही कमी नाही. तीर्थक्षेत्रांच

उद्देशच मुळी हा असतो. ऐहिक जीवनापासून लांब जाऊन मनाला शांति आणि प्रसन्नता लाभावी, पारलौकिक जीवनाविषयींची आसक्ति वाढावी हाच या मागील हेतू असतो. तो जर शिर्डीला जाण्याने सिद्ध होत असेल तर त्या क्षेत्राच्या अस्तित्वाची सफलता मानावी लागेल !

तथापी तीर्थ क्षेत्रास जाणारे लोक पापक्षालनार्थ आणि पुण्य संपादण्यासाठी जात असतात असे नाही, देवदर्शनासाठी जाणाऱ्या लोकात हौसे, गवसे आणि नवसे या तीनही प्रकारचे यात्रिक असतात. हौसे आणि गवसे यांची संख्या अल्प असली तरी श्रद्धाळूपणाने जाणाऱ्यांचीच संख्या विपुल असते. नवसे म्हणजे आपल्या मनकामना पुऱ्या व्हाव्यात अशी आकांक्षा बाळगणाऱ्या लोकांचा यात विशेष भरणा असणार आणि तसा तो असणे अस्वाभाविकहि नव्हे. जीवन हे खडतर आहे हे निःसंशय, त्याचप्रमाणे मनुष्यप्राणी हा लोभसवृत्तींचा, स्वार्थी आणि महत्वाकांक्षी आहे. आपल्यापाशी जे नाही ते आपणास प्राप्त व्हावे असे इच्छिणाऱ्या लोकाप्रमाणेच आपल्याजवळ जेवढे आहे त्यापेक्षा त्यात अधिक वाढ व्हावी अशी मनीषा बाळगणारेहि अनेक आहेत आणि म्हणूनच गरीब व श्रीमंत या दोन्ही वर्गातील लोकांचा संगम या असल्या तीर्थक्षेत्रांचे ठायी होत असतो. यात सर्वांचा हेतू एकच असतो आणि तो म्हणजे नवस करण्याचा—मनकामना पुऱ्या करून घेण्याचा.

त्यातच हल्लीचे जीवन अत्यंत धकाधकीचे झाले. मनाला शांती अशी कुठेच नाही, आणि म्हणूनच हे खडतर जीवन काहीतरी सुसह्य व्हावे या इच्छेने माणूस जर या असल्या एखाद्या तीर्थक्षेत्री गेला तर त्यात वावगे असे काहीच नाही. नव्हे, तो त्या ठिकाणी हटकून जातो असाच अनुभव आहे. अर्थातच त्यांना त्यांच्या श्रद्धेनुसार काही प्रचीति आली की तिलाच चमत्काराचे रूप दिले जाते.

आज जी जी तीर्थक्षेत्रे भारतात जागोजागी अस्तित्वात आहेत त्यांना काही विशिष्ट माहात्म्य प्राप्त झालेले आहे, त्याचप्रमाणे शिरडीलाहि साईबाबांच्या अस्तित्वामुळे तसलेच माहात्म्य प्राप्त झालेले आहे व म्हणूनच ते पुण्यक्षेत्र बनले आहे.

शिरडी हे जागृत पुण्यक्षेत्र म्हणूनच आज गणले जात आहे, आणि म्हणूनच इतर पुराणक्षेत्राप्रमाणे भाविकांचा ओघ तिकडे वाढत्या प्रमाणात आहे. इतर सर्व पुराणक्षेत्रांच्या मागे चमत्काराचे वलय आहे आणि चमत्काराशिवाय नमस्कार नाही या म्हणीप्रमाणे

पण या चमत्कारांचा बाऊ निदान हिंदु मनाला तरी वाटण्याचे काहीच कारण नाही. आमच्या पुराणकथातून आणि धार्मिक ग्रंथातून या असल्या दैवी चमत्काराना मुळीच तोटा नाही. देवादिकांनी दाखविलेले चमत्कार तर आज सर्वांनाच मुखोद्‌गत आहेत. परंतु या देवांची महति ज्यांनी अखंड गायिली आहे त्या साधुसंतानीहि अनेक चमत्कार घडवून आणल्याचे ग्रंथांतरी नमूद आहे. हिंदु धर्मात अशी एकहि देवता नाही की, जी चमत्कारापासून अलिप्त आहे. त्याचप्रमाणे ज्या पांडुरंगाची भक्ति आधुनिक साधुसंतानी केली त्या पांडुरंगाचे अनेक चमत्कार वारकरी पंथात नि भागवत धर्मात आज प्रचलीत आहेत. संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वरांपासून साधु तुकोबारायांपर्यंत सर्वांच्याच जीवनात अनेक चमत्कार आढळून आलेले आहेत. त्या सर्वांवर आम्ही आजवर विश्वास ठेवीत आलो. ज्ञानेश्वरांनी रेड्याकडून वेद म्हणविला त्याचा अचंबा पैठणच्या ब्रह्मवृंदाला वाटला. नामदेवाशी तर प्रत्यक्ष पांडुरंग बोलत असे, त्याने खावयास दिलेले खात असे. त्याची दासी जनी हिच्याबरोबर तो दळण दळीत असे, लुगडी धूत असे. याच देवाने देऊळ गरगर फिरवून बादशहाला चकित करून सोडले. भानुदासाला सुळावर चढविले असता त्या सुळाला पालवी फुटली. मीराबाईच्या हातातल्या विषाच्या प्याल्यात अमृत निर्माण झाले. गोऱ्या कुंभाराने तुडविलेले मूल जिवंत झाले. राका कुंभाराच्या धडधडत्या भट्टीतून मांजराची पिले सुरक्षित बाहेर पडली. कबीराला शेले विणण्यात देवाने मदत केली. तुकारामाच्या अभंगांच्या पोथ्या परत मिळवून दिल्या. त्याच तुकारामाने परत केवळ नामस्मरणाने शिवाजी महाराजांवर आलेल्या परचक्राचे निवारण केले. मृतांना जीवनदान दिल्याच्या चमत्कार कथा तर बहुतेक सर्व संतांच्या चरित्रात वाचावयास सापडतात. याला रामदास स्वामीहि अपवाद ठरले नाहीत. या असल्या चमत्काराशिवाय संतचरित्राना परिपूर्णता येतच नाही, आणि ते अविश्वसनीय आहेत असे तरी कसे म्हणावे ! कारण, ज्या संतांवर आपली पूर्ण श्रद्धा, त्या संतानिच पूर्वीच्या संतांच्या चमत्काराचा निर्वाळा दिलेला आहे. नामदेव हा किती तरी संतांचा समकालीन. वयानेहि अधिक अनेक संतांचे अवतारकार्य त्याने पाहिलेले. अर्थात्‌च त्याने जे अभंग रूपाने लिहून ठेवले आहे ते खोटे तरी कसे म्हणता येईल ! आणि म्हणूनच आजवर आम्ही त्यावर श्रद्धा ठेवीत आलो आहोत. त्याबाबत आता कुणी काथ्याकूट करीत नाही अगर साशंकताही उपस्थित करीत नाहीत.

असो अशा या संत श्रेष्ठातच श्री साईबाबांची गणणा केली जाते- चालू परिस्थिती नुसार समाजाला मार्गदर्शन करणे आणि त्यांची परमेश्वरावरील श्रद्धा वाढविणे हेच त्यांचे अवतार कार्य असते. संत कबीराने हिंदु मुसलमान ऐक्या संबंधाने खूप

प्रचार केला आहे. समर्थ रामदास स्वामीनीही स्वराज्य स्थापनेच्या काळात त्याला पूरक असेच थोर कार्य पार पाडले. आहे. त्याचप्रमाणे आधुनिक काळाला साजेसे कार्य साईबाबांनी केले आहे. समानता ही त्यांची शिकवण आहे. धर्म, जाती, उच्च नीच हे भेदभाव त्यांच्यापाशी नाहीत. पूर्वीच्या सर्व संतानीही हेच सांगितलेले आहे. त्या दृष्टीने त्यांच्यात नि साईबाबांच्यात भेदभाव काहीच नाही. त्याबरोबरच त्यांच्या साधुत्वा विषयीही साशंक असल्याचे कारण काहीच नाही. साधुचे सर्व गुण त्यांच्यात होते. वैराग्य हा साधुचा प्रमुख गुण आहे. तो त्यांच्या पाशी होता. ते निरिच्छ होते. गरीबांचे कनवाळू होते, द्रष्टे होते. प्रत्येक प्राणीमात्र हा परमेश्वराचा अंश आहे. परंतु ज्याच्या त्याच्या पूर्व कर्मांची फले त्याला प्राप्त होत असतात व त्याच्या जीवनाच्या विकास होत असतो. माणसातही आपण काही लोकांना देव माणूस म्हणतो. या देवमाणसाचा अर्थ तरी काय ! ज्याच्यात परमेश्वरी अंश अधिक असतो त्यालाच देवमाणूस म्हटले जाते, आणि हे साधुसंत आपल्या भक्तीभावाने, तपश्चर्येने परमेश्वरा समोर जाऊन पोहचत असतात. अशाच परमेश्वर स्वरूपी साधुजनांच्या कृतींना चमत्काराचे तेज प्राप्त होत असते. सान्याच जनाना त्याचे आकलन होत नाही, पण म्हणून त्याचे दिव्यत्व कमी होत नाही. तेच सामान्य अज्ञ, मूढ जनांना प्रेरणा देतात. या प्रेरणा म्हणजेच चमत्कार होत. श्रद्धाळू मन त्यावर चटकन, विश्वास ठेवते आणि नाही तरी आजवर जग केवळ श्रद्धेवरच चालत आलेले आहे आणि यापुढेही चालत रहाणार आहे. श्रद्धा हाच भक्तीचा आत्मा आहे आणि भक्ती ही परमेश्वराची ओळख पटवून देणारी दिव्य शक्ती आहे. देव भावाचा भुकेला आहे मग हा भाव कुठेही व्यक्त करा त्यात संतांना समाधान प्राप्त होत असते.

❀ ❀ ❀


## श्री साईलीला

**साई काव्यबहार विशेषांक - फेब्रुवारी १९८१**

**७ व्या लेखक-कवी संमेलन प्रसंगी अध्यक्षांचे हस्ते**

**प्रकाशित होत आहे.**

# श्री सद्गुरुंच्या शोधात

श्री. महादेव दत्तात्रय भिडे,
११९५ सदाशिव पेठ पुणे ३०

● मनुष्य प्राणी जन्माला आल्यानंतर, बालपण संपताच, तरुणपणात प्रवेश करतो व प्रपंचाच्या चक्रात सापडतो. वयाच्या ३०-३५ वर्षापर्यंत मिळालेले शिक्षण अंगात असलेली रग, ताकद अगर कर्तबगारी यामुळेच आपणाला सर्व सुखोपभोग मिळतो. दैव प्रारब्ध यांचा काहीही संबंध नाही. माणसाच्या कर्तबगारीवर सर्व मिळते अशी त्यांची समजूत, धारणा झालेली असते.

या वयात तरुण मुलाना अगर मुलीना, खावे प्यावे मजा करावी हेच काय ते सुखी जीवन असे वाटते या पलीकडे काही जग आहे याची कल्पना त्याना नसते. पण संसारात जेव्हा कौटुंबिक आघात बसू लागतात, नोकरी अगर धंद्यात मानापमान चढ उतार सारखे सोसण्याची पाळी येते, तेव्हा तो वैतागून जातो, बेचैन होतो, दुःखाने हैराण होतो. कोणीतरी यातून आपणाला सोडविल का ? मार्ग दाखविल का ? असे वाटू लागते. आपल्यापरी सर्व प्रयत्न करूनही उपयोग होत नाही असे जेव्हा त्याला समजते, तेव्हा तो हताश होतो. येथेच प्रथम त्याच्या अहंकाराला झटका बसतो. त्याचे डोळे खाडकन उघडतात देव, ज्योतिषी, नवस याकडे तो वळतो व जे जे कोणी सांगेल ते तो करू लागतो. अशावेळी गुरु, सद्गुरु जे करतील अगर लोक सांगतील त्यांच्या नादी लागतो. यावेळी खरा कोण ! खोटा कोण ! हे न समजल्याने त्याची फसगत होते. असे समाजात आपल्याला पाहावयास मिळते.

आपल्याकडे गुरु, सद्गुरु, संत आहेत की जे समाजासाठी गरीबांची दुःखे जाणून ती दूर करण्यासाठी व रंजले गांजलेल्याना दिलासा देण्यासाठी. पण त्यांना ओळखणे कठीण आहे. यासाठी मुमुक्षु व सामान्य जनाना मार्गदर्शन करण्यासाठी संत एकनाथी भागवतात तिसऱ्या अध्यायात मार्गदर्शन केले आहे. त्यावरून सद्गुरु, संत, गुरु ओळखण्यास मदत होईल. संत एकनाथानी जे सांगितले ते खाली दिले आहे. ती लक्षणे अशी.

१) प्रापंचिक काळग्रस्त जीवांच्या उद्धारासाठी, काया, वाचा मने शिष्याला अति कृपाळू त्याचे भवबंधन तोडणारा पण त्याचा संपूर्ण अहंकार नाहीसा करणारा असतो.

२) ज्याचा जैसा भाव, तैसा भक्ताना अनुभव देतो पण तो अणुमात्रही त्याचा अहंभाव धरीत नाही.

३) शिष्याकडून सेवा घ्यावी असे त्याच्या स्वप्नातही येत नाही उलट शिष्याची सेवा स्वतःच त्याच्या ठिकाणी पूज्यभाव, परमेश्वर स्वरुप मानून करतो.

४) शिष्याला तो पुत्रवत् मानतो. लहान मोठा मानीत नाही तो पूर्णब्रह्माचाच अंश आहे असे शिष्याचे ठिकाणी पाहतो.

५) शिष्याने आपणहून सेवा केली तरी त्यास सेवक समजत नाही. सर्व भगवद्रुपच मानतो. सेवकत्व त्यामुळे राहात नाहीं.

६) आपण योगी व वेदशास्त्र पारंगत व जाणता असूनही ज्ञानी म्हणून जगात मिरवीत नाही.

७) स्वतःच्या चरितार्थाचा भार शिष्यावर टाकीत नाही तसे त्याच्या स्वप्नातही येत नाही. उलट शिष्यावर आलेल्या संकटाचे निवारण ते स्वतःवर आले आहे असे समजून करतो.

८) विषयाचा त्याग अगर भोग हे प्रारब्ध म्हणून मानतो व भोगतो. देहात वावरत असूनही, देह पालखीत मिरविला काय ! अगर विष्टेत लोळला काय ! तरी त्याचे त्यास सुख दुःख होत नाही.

९) स्त्रीयानी भर्ता, पुत्र म्हणून पिता, शिष्य म्हणून गुरु म्हणून त्यांनी मानले तरीं तो अलिप्त असतो, सर्वांभूती हरी माना व त्या समजा असे तो सांगतो तशी प्रचिती देतो व स्वतःही आचरतो.

१०) त्यांचे अंगी निजशांती पूर्ण-असते व तो सदा ब्रम्हानंदात मग्न असतो.

श्री भगवान गुरु दत्तात्रयांनी तर चोवीस गुरु केले. विश्वातील चराचर सृष्टी प्राणी मात्रात असलेले उत्तम गुण घेतले त्यांचा संग्रह केला व ज्यांचे ठिकाणी हे गुण दिसले त्यानाच गुरुत्व दिलेले दिसून येईल (१) पृथ्वी (५) अग्नी (३) वायू (४) रवी (सूर्य) (५) पर्वत (६) समुद्र (७) मधमाशी (८) भ्रमर (९) मृग (१०) टिटवी (११) कोळी (१२) अजगर (१३) वृक्ष (१४) आकाश (१५) उदक इत्यादी असे चोवीस होत या सर्वांपासून शांतता, तेजस्वितता रसमाधूर्य उदासीनता, अलिप्तता, परोपकारीता, गंभीरता संग्रह न करणे, सार ग्रहण, [नादान साधने पासून च्यूती हे ज्ञान, अमीष त्याग, नारायणाच्या माया ईश्वरादि प्रसरण आवरण ह्याचे ज्ञान श्रीगुरुनी मिळविले.

**आपल्यासारख्या प्रापंचिक माणसांना वरील सर्व गुण एकत्रित असे कोठे पहावयास मिळत असतील तर ते संताचे ठिकाणीच होत.** गजानन महाराज शेगांव, समर्थ श्री स्वामी अक्कलकोट महाराज, समर्थ रामदास, ज्ञानेश्वर, तुकाराम शिर्डीचे साईबाबा हे त्यापैकीच होत. हे देहाने गेले असले तरी

भक्तांच्या हाकेला संकटाला धावून येतात व संरक्षणही करतात. शिर्डीचे साईबाबांनी आपण ह्यात असताना व नंतरही भक्तांचे रक्षण केले, व प्रचिती दिली व अजूनही ते देत आहेत. **एकनाथांनी सांगितल्याप्रमाणेच श्रीसद्गुरुंची लक्षणे व वागणूक साईबाबांची होती.** भक्तात लहानथोर, गरीब हा भेदभाव मानला नाही. सर्व रंजले गांजलेल्याना दिलासा दिला व दुःखे दूर केली भक्तांचा अहंकार नष्ट करून भक्तीमार्गाला लावले. एका कुष्ठरोगी भक्तांची सेवा बाबांनी स्वतःच्या हातांनी केली. ज्याचा जैसा भाव तो ओळखून त्यास अनुभव दिला व प्रचिती दिली सर्व मानव एकाच परमेश्वराची लेकरे आहेत हे दाखविले व त्यातील विषमता कमी केली. स्वतः नित्य भिक्षा मागत, आजारी असतानासुद्धा शिष्यावर चरितार्थाचा भार कधीच टाकला नाही. आलेला पैसा रोज वाटून टाकीत. संग्रह केला नाही. समता, नम्रता शिकविली. स्वतःचे सुखदुःख त्यांना नव्हतेच. देहाने भोगत असताना त्यांनी ते कधी दाखवले नाही. एका भक्तासाठी स्वतःचे आयुष्याचे मोल देऊन त्याला मरणाच्या दाढेतून वाचविले. हे सर्व करीत असूनही अहंभाव, अहंकारापासून ते अलिप्त होते. आलेल्याना 'अल्ला भला करेगा,' असे सांगत. अशा संताना शरण जा, त्यांना आपले सुखदुःख सांगा व सर्व भार त्यावर सोपवा.

श्री साईलीला मासिकातून भक्ताना आलेले अनुभव ह्यातीतील व नंतरही ते प्रसिद्ध होत आहेत त्यात गरीबापासून श्रीमंतापर्यंत, अशिक्षितापासून डबल ग्रॅज्युएट पर्यंतचे डॉक्टर्स, वकील (प्रख्यात) आहेत हे विशेष होय. त्यामुळे बाबांच्या लीलांचे ज्ञान होते. व आपल्या संकटकाली त्यास शरण जावे असे वाटू लागणे साहजिकच आहे. हजारो भक्त शिर्डीस येतात. बाबांचे दर्शन घेतात व समाधानाने परत जातात व त्यांनी श्रद्धा व सबुरी दिलेल्या संदेशावर विश्वास ठेवतात व वागताहेत. भक्त त्यांना अंतःकरणापासून हाक मारतात. बाबा तुमचे पाठीशी उभे आहेत. **जे आपल्या हाकेला धावून येतात तेच आपले सद्गुरु होत. निराळे सद्गुरू शोधण्याचे कारण नाही, व फरूगतही होणार नाही.**

हे लिहित असताना मला आलेला बाबांचा अनुभव येथे देणेचा मोह आवरत नाही. एकनाथी भागवतातील काही संदर्भ मला हवे होते. माझे एकनाथी भागवत मी वाचावयास दुसऱ्यास दिले होते. ते कसे मागावे या विचारात २।३ दिवस होतो त्या शिवाय हा लेख पुरा होत नव्हता. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे ज्याना वाचावयास दिले होते त्यानी २५।१०।८० रोजी सायंकाळी ५ वाजता न मागता आपणहून आणून दिले. म्हणाले, 'थोडे वाचावयाचे राहिले आहे पण १५ दिवसानी तुमचेकडून घेऊन जाईन. श्रीसद्गुरु साईबाबांनी माझी अडचण दूर केली व हा लेख पुरा करून घेतला.

☆

# गुर्वाज्ञापालन हाच खरा शिष्यधर्म

प्रा. र. श्री. पुजारी एम. ए. एम. एड.
रमा निवास ९९२ सदाशिव पेठ पुणे ३०

● सद्‌गुरुंना स्नान घालणे, त्यांची वस्त्रे धुणे, स्वतः अन्न शिजवून त्यांना जेऊ घालणे, त्यांचे पाय चुरणे इतकेच नव्हे तर गायन-वादन-लेखन-कीर्तन यांच्याद्वारे त्यांच्या गुणांचे स्तवन करणे हीही त्यांची सेवाच होय. अशा सेवेमुळे सद्‌गुरुना संतोष होतो. त्यांची कृपा लाभते. परंतु ज्या सेवेमुळे सद्‌गुरु परम संतोष पावतात आणि कृपेचा वर्षाव करतात ती सेवा याहून निराळी आहे. लौकिकातील निंदा-स्तुती बाजूस ठेवून, प्रसंगी अपमान, देहक्लेश, वित्तहानी सोसून सद्‌गुरुनी केलेल्या कोणत्याही आज्ञेचे त्वरित प्रतिपालन करणे हीच ती परम कृपादायी सेवा होय.

सद्‌गुरु हाती माती घेऊन तिच्यामधून मडके घडवीत असतात. हे घडविणे चिखल पायाखाली चांगला तुडविण्यापासून, त्याला चक्रावर घालून योग्य तो आकार देण्यापासून, तो मडके अग्नीत चांगले भाजण्यापर्यंत सुरूच असते. अंती मडके पक्के झाले ना, हे पाहाण्यासाठी सद्‌गुरु ते वाजवून पाहतात. शिष्याच्या अध्यात्म-जीवनातील परीक्षा उत्तीर्ण होण्याचा कसोटीचा क्षण तो हाच असतो. या क्षणी आपल्या आज्ञेचे प्रतिपालन तंतोतंत झाले किंवा नाही हेच सद्‌गुरु पाहात असतात.

कधी कधी सद्‌गुरुंना शिष्यपरीक्षेसाठी केलेली आज्ञा फारच तापदायक असते. ती लोकविलक्षणच नव्हे तर शिष्याच्या जिवावर बेतणारीही असते. ब्रह्मचैतन्य श्रीगोंदवलेकर महाराज यांचे सद्‌गुरु श्रीतुकाराम चैतन्य अशीच एखादी भयंकर आज्ञा आपल्या शिष्यास करीत. पंधरा वर्षे वयाचे श्रीगोंदवलेकर महाराज श्रीतुकाराम चैतन्यांच्या घरी येहळे गावी राहिले असताना त्याना शिष्यपरीक्षेच्या अशाच तीन कठोर आज्ञाना तोंड द्यावे लागले. त्यापैकी पहिली आज्ञा म्हणजे तोडलेली झाडाची पाने त्या त्या जागी पुन्हा चिकटविणे ! दुसरी आज्ञा म्हणजे नदीच्या वाळवंटात खड्डा खणून तेथे खेळणाऱ्या लहान लहान बालकांना त्या खड्ड्यात गाडणे ! तिसरी आज्ञा म्हणजे डोहात बुडी मारणे व गुर्वाज्ञा झाल्याशिवाय वर न येणे !

या तीन आज्ञांच्या परिपालनात शिष्याच्या पदरी मूर्खपणा, मारपीट आणि पाण्यात घुसमटणे या तीन गोष्टी आल्या ! परंतु मेघांच्या गडगडाटानंतर पृथ्वीवर अमृतधारा कोसळू लागाव्यात तशी सद्‌गुरुकृपाही या परम आज्ञाधारक शिष्यांवर लगेचच झाली.

सरस्वती गंगाधर रचित श्रीगुरुचरित्रग्रंथात श्रीस्वामी नृसिंहसरस्वती यांनी पर्वती नावाच्या एका शेतकरी भक्ताची घेतलेली परीक्षाही अशीच लोकविलक्षण दिसते. पोटरीस आलेल्या आपल्या शेतातील जोंधळयाच्या पिकावरून श्रीस्वामीनी आपली अमृतदृष्टी एकवार फिरवावी अशी अपेक्षा असलेल्या या भक्ताला ते सुंदर पीक दुपारपर्यंत समूळ कापून टाकण्याची आज्ञा श्रीस्वामीनी केली! ती आज्ञा या परम गुरुभक्ताने तंतोतंत पाळली! परिणामी तोंडाशी आलेला अन्नाचा घास एका संन्याशाच्या नादी लागून या माणसाने मातीत कालविला या विचाराने त्या शेतकऱ्याच्या घरीदारी हाहाःकार माजला! परंतु सद्‌गुरूंनी घेतलेली परीक्षा केवळ आज्ञापालनापुरतीच मर्यादित असते हे त्यांना माहीत नसल्यामुळे अंती त्या घरी शतपट भरपाईमुळे आनंदी आनंदच झाला!

कृपांकित भक्त, सत्कवी हेमाडपंत विरचित श्रीसाईसच्चरितात भक्त सॉलिसिटर काकासाहेब दीक्षित यांच्या गुरुभक्तीची कसोटी पाहण्याचा असाच एक लोकविलक्षण प्रकार तेविसाव्या अध्यायात आढळतो. विद्याविभूषित असल्यामुळे अत्यंत सुसंस्कृत असलेले मन, परम गुरूभक्तीमुळे मनास आलेला हळुवार आर्तभाव, भक्ती-ज्ञान वैराग्य यामुळे जीवमात्रांविषयी अतीव कनवाळू झालेले अंतःकरण आणि तपामुळे मनास जडलेली पराकाष्ठेची अहिंसावृत्ती हे सर्व ध्यानी घेऊनच सद्‌गुरु श्रीबाबा यांनी त्यांना प्रतिपालनास अत्यंत बिकट, अवघड, निष्ठुर अशी अजाहननाची म्हणजे बोकडास ठार मारण्याची आज्ञा केली असावी!

दया हाच धर्म असे सांगणारे संतमहात्मे, अनाथांचे रक्षण हेच ब्रीद असलेला दयाळू ईश्वर, विवेक – वैराग्य हेच ध्येय असलेले सज्जन, या सर्व धर्मनीतीच्या पलिकडे असलेले हे कसले विचित्र क्रौर्य साक्षात दयामूर्ती श्रीबाबांनी आज आरंभिले बरे! एका सात्त्विक भक्ताच्या हाती धारदार सुरी देऊन एका आजारी, मरणोन्मुख, निरपराधी जीवाची हत्या करण्यास त्याला भाग पाडणे म्हणजे पापाचा भला मोठा डोंगर त्याच्या शिरावर रचणेच नव्हे काय!

परंतु जेथे मुसलमान जातीचे, मांसाहारी बडेबाबा हे कृत्य करण्यास मुळीसुद्धा धजले नाहीत तेथे ब्राह्मण जातीत जन्मलेले, भावार्थाची केवळ मूर्ती असे काका दीक्षित अस्तन्या वर करून सरसावले, मनाच्या चिंध्या होत असतानाही सरसावले ही गुरुभक्तीची आणि पर्यायाने गुरुसेवेची परिसीमाच नव्हे काय!

काकासाहेबांची ही भक्ति–सेवा पाहूनच श्रीबाबा संतुष्ट झाले. अजाहननापासून त्यांना परावृत्त करून श्रीबाबा लगेच म्हणाले, 'अरे, अरे! काका, काय रे

तुझे हे दगडासारखे निष्ठुर मन ! अरे, चांगला ब्राह्मणकुळात जन्म घेतलास आणि एका मुक्या जीवाची हिंसा अगदी सहज करावी तशी करायला निघालास ! धन्य आहे तुझी ! अरे, जिवाला काही लाज भीती-शरम ! सोड, सोड आधी त्या बोकडाला ! जाऊदे त्याला येथून ! तुझ्या हातून निर्दयपणाचे मरण त्या बिचाऱ्याला यायला नको ! '

शिष्याला केलेल्या आज्ञेचे कठोर शब्द शिष्याची तयारी पाहूनच सद्गुरूंनी परत घेण्याइतका शिष्याचा श्रेष्ठ गौरव तो दुसरा कोणता असू शकेल ? परंतु सद्गुरूंनी केलेल्या या गौरवामुळे फुगून न जाता आपल्या हातून गुर्वाज्ञेचे पालन त्यांच्याच कृपेमुळे घडले हा कृतार्थतेचा भाव मनी बाळगणारे काकासाहेब सद्गुरु श्रीबाबांना म्हणाले, " देवा ! आपला शब्द म्हणजे आमचे वेदवाक्य. दुसरे काहीही आम्हास कळत नाही. आपल्या आज्ञेहून अन्य धर्मही आम्हास ठाऊक नाही. '

गुर्वाज्ञापालन म्हणून मुंग्याना पिठीसाखर घालणारा काशिराम शिंपी, नेवाश्यास पोचताच श्रीबाबांच्या आज्ञेनुसार जगच्चालक मोहनीराजास साष्टांग दंडवत घालणारा अप्पा कुलकर्णी, कोराळे गावी जाऊन बकऱ्याची सागुती आणण्यास तयार झालेले वृद्ध दादाभट केळकर, बाबांच्या आज्ञेशिवाय कोणतेही काम न करणारे माधवराव ऊर्फ शामा देशपांडे, शिरडी सोडताना बाबांची आज्ञा तंतोतंत, शब्दशः पाळणारे नूलकर, दाभोलकर, महाजनी इत्यादी सर्व विद्यासंपन्न भक्तांची भक्ती विचारात घेता गुर्वाज्ञापालन हा एकच गुरुमान्य मोक्षमार्ग दिसतो.

रामकृष्ण परमहंसानी वैद्यांचे तीन प्रकार सांगून जो वैद्य हट्टी रोग्याच्या छातीवर गुडघा टेकून त्याच्या घशात औषध ओततो व त्याला व्याधिमुक्त करतो, तोच सर्वोत्कृष्ट वैद्य अशी व्याख्या केली आहे. भवरोगाने तळमळ असतानाही जे भक्त आपला हट्टीपणा सोडत नाहीत आणि सद्गुरुनी केलेल्या आज्ञेचा अवमान करतात अशांसाठी श्रीबाबांनी अपघात होणे, उपासमार होणे, गाडी चुकणे अशा सौम्य शिक्षांची योजना केली. गुर्वाज्ञाभंगाची ही शिक्षा होय. या शिक्षांमुळे अनेक कच्चे भक्त ताळ्यावर आले आणि गुर्वाज्ञापालनाचे महत्त्व वेदनेमधून शिकले. या सर्व गोष्टींचा अर्थ इतकाच की गुरुवचनावर श्रद्धा ठेऊन जे भक्त प्रत्येक क्षणी स्वतःत धारणा करतात तेच खऱ्या अर्थाने सद्गुरुना प्रिय होतात.

# श्री साईनाथमहिम्नस्तोत्र

— ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
१/१४ फाइव्ह स्टार अपार्टमेंटस
बंड गार्डन रोड, पुणे — ४११००१

● हे स्तोत्र शिरडी येथे रोज दुपारच्या व धूप आरतीच्या वेळी म्हटले जाते. हे साकोरीच्या उपासनी महाराजांनी रचलेले आहे व फारच सुंदर अर्थाने भरलेले आहे. ते संस्कृत भाषेत असल्याने पुष्कळसे भक्त ते अर्थ न कळताच म्हणत असतात. म्हणून असल्या भक्तांचे माहितीसाठी या लेखात मी मूळ संस्कृत स्तोत्र मराठी भाषांतरा सहित देत आहे. वाचकांना ते आवडेल अशी आशा करतो.

महिम्न म्हणजे महिमा व स्तोत्र म्हणजे स्तुती असलेले काव्य. ज्या स्तुतीपूर्ण काव्यात श्री साईनाथांचा महिमा गायला आहे ते हे स्तोत्र. संस्कृत भाषेत श्री शिव महिम्न स्तोत्र फार प्रसिद्ध आहे व बऱ्याच शिव भक्तांच्या नित्य पाठात म्हटले जाते. श्री शंकराला प्रसन्न करून घेण्याचे ते अतिउत्तम साधन समजले जाते. म्हणूनच त्याच धर्तीवर उपासनी महाराजानी, जे श्री साईबाबांना आपले सद्गुरु व ईश्वर मानीत होते, हे स्तोत्र लिहीलेले दिसते. प्रत्येक श्लोकपदात श्री साईनाथांना त्यांनी सद्गुरु व ईश्वर तर म्हटलेच आहे परंतु ८ व १० व्या पद्यात तर त्यांना साक्षात् पर ब्रह्म व साईरूप धारण केलेले श्री रामचंद्र प्रभूच म्हटले आहे. उपासनी महाराजां सारख्या स्वतःच महान संत असलेल्या व्यक्तीने श्री साईनाथाना असे म्हटल्यावर आम्हा सारख्या साधारण मनुष्यानी त्यांच्या ईश्वरत्वा बद्दल शंका घेणे हे मूर्खपणा चेच नाही का ?

श्री शिवमहिम्नस्तोत्राप्रमाणे हे स्तोत्रही आपल्या इष्टदेवतेची म्हणजे श्री साईनाथांची कृपा संपादन करण्याचे उत्तम साधन आहे आणि तसे उपासनी महाराजानी स्तोत्राचे शेवटी १५ व्या पद्यात म्हटलेच आहे की जो भक्त हे स्तोत्र सदा मन लावून व भक्तीने म्हणेल तो सद्गुरु साईनाथांच्या कृपेला त्वरित पात्र होईल.

☆

# । श्री साईनाथ महिम्न स्तोत्रम ।

[ मराठी अनुवादासह ]

( जगती )

( चित्-आनंद-कंदं ) ( जगत्-संभव-स्थान-संहार-हेतुम् )

सदा सत्स्वरूपं चिदानंदकंदं, जगत्संभवस्थान संहार हेतुम्
स्वभक्तेच्छया मानुषं दर्शयंतं, नमामीश्वरं सद्गुरुं साईनाथम् ॥१॥

( स्वभक्त- इच्छया ) ( नमामि-ईश्वरं

सदा आपल्या खऱ्या म्हणजे ब्रह्म स्वरूपांत असलेल्या, चैतन्य व आनंद यांचे मूळ असलेल्या जगाच्या उत्पती, आधार व संहार याचे कारण असलेल्या आणि आपल्या भक्तांच्या इच्छेखातर मनुष्य रूपाने प्रकट होणाऱ्या अशा साक्षात् ईश्वरच असलेल्या सद्‌गुरु साईनाथांना मी नमस्कार करतो.

( भव-ध्वांत-विध्वंस-मार्तंडम्-ईड्यं ) ( मनः वाक्-अतीतं )

भवध्वांतविध्वंसमार्तंडमीऽयं, मनोवागतीतं मुनिध्यानगम्यम् ।
जगद्व्यापकं निर्मलं निर्गुणं त्वां, नमामीश्वरं सद्गुरु साईनाथम् ॥ २ ॥

( जगत्-व्यापकं )

संसारातील अंधाराच्या नाश करणारा जणूकाय सूर्यच असणाऱ्या, स्तुती करण्या योग्य असणाऱ्या, मन व वाणी यांच्या पलीकडे असणाऱ्या मुनींना ध्यान करून प्राप्त होणाऱ्या, जगाला व्यापून असणाऱ्या निर्मल व निर्गुण अशा साक्षात् ईश्वरच असलेल्या सद्‌गुरु साईनाथाना मी नमस्कार करतो.

( भव-अंभोधि-मग्न-अर्दिताना)

भवांभोधिमग्नार्दितानां जनानां, स्वपादाश्रितानां स्वभक्तिप्रियाणाम् ।
समुध्दारणार्थं कलौ संभवंतं, नमामीश्वरं सद्‌गुरु साईनाथम् ॥ ३ ॥

संसाररूपी सागरात बुडालेल्या दुःखी जनांच्या, आपल्या चरणांच्या आश्रयाला आलेल्यांच्या, आणि आपली भक्ति ज्याला प्रिय आहे अशांच्या संपूर्ण उद्धारासाठी कलियुगात प्रकट झालेल्या अशा साक्षात् ईश्वर असलेल्या सद्‌गुरु साईनाथानां मी नमस्कार करतो.

**सदा निंबवृक्षस्य मूलाधिवासात्, सुधास्राविणं तिक्तमप्यप्रियं तम् ।**
**तरु कल्पवृक्षाधिकं साधयंतं, नमामीश्वरं सद्गुरूं साईनाथम् ॥ ४ ॥**

सदा निंबवृक्षाच्या मूळाशी राहिल्यामुळे त्या कडू व नावडत्या वृक्षाला देखील अमृत वाहावयाला लावून त्याला कल्पवृक्षापेक्षाही मोठे बनविणाऱ्या अशा साक्षात् ईश्वर असलेल्या सद्गुरु साईनाथाना मी नमस्कार करतो.

(भवत्-भाव बुध्या)

**सदा कल्पवृक्षस्य तस्याधिमूले, भवद्भावबुध्या सपर्यादिसेवाम् ।**
**नृणां कुर्वतां भुक्तिमुक्तिप्रदं तं, नमामीश्वरं सद्गुरु साइनाथम् ॥ ५ ॥**

सदा त्या कल्पवृक्षाच्या मूळाशी आपली भक्तीने व बुद्धीने सेवा करणाऱ्याना भोग आणि मोक्ष देणाऱ्या अशा साक्षात् ईश्वरच असलेल्या सद्गुरु साईनाथानां मी नमस्कार करतो.

(अनेक-अश्रुत-अतर्क्य-लीलाविलासैः) (सम-आविष्कृत-ईशान-भास्वत्-प्रभावम्)

**अनेकाश्रुतातर्क्यलीलाविलासैः, समाविष्कृतेशानभास्वत्प्रभावम् ।**
**अहंभावहीनं प्रसन्नात्मभावं, नमामीश्वरं सद्गुरूं साइनाथम् ॥ ६ ॥**

अनेक न ऐकलेल्या व तर्क न करता येणाऱ्या लीला करून साक्षात् शंकराचा तेजस्वी प्रभाव प्रकट करणाऱ्या, अहंकार नसलेल्या व आनंदित स्वभाव असलेल्या अशा साक्षात् ईश्वर असलेल्या सद्गुरु साईनाथानां मी नमस्कार करतो.

(विश्रम-आराम बगीचा-एव-अभिरामं)

**सतां विश्रमाराममेवाभिरामं, सदा सज्जनैः संस्तुतं सन्नमद्भिः ।**
**जनामोददं भक्तभद्रप्रदं तं, नमामीश्वरं सद्गुरु साइनाथम ॥ ७ ॥**

(जन-आमोद-दं) (भक्त-भद्र-प्रदं)

साधू जनांच्या विश्रांतीसाठी जणुकाय सुंदर बगीचाच असणाऱ्या, वाकून नमस्कार करणाऱ्या सज्जनाकडून सदा स्तुती केला जाणाऱ्या, लोकाना आनंद व भक्तांचे कल्याण करणाऱ्या अशा साक्षात् ईश्वर असलेल्या सद्गुरु साईनाथानां मी नमस्कार करतो.

(अजन्म-आद्यम्-एकं) (रामम्-एव-अवतीर्णम्)

अजन्माद्यमेकं परब्रह्म साक्षात्, स्वयं संभवं राममेवावतीर्णम् ।
भवद्दर्शनात्संपुनीतः प्रभोऽहं, नमामीश्वरं सद्गुरं साइनाथम् ॥८॥
( भवद्-दर्शनात्-संपुनीतः )

अजन्मा, सर्वांच्या आधीपासून असलेल्या, अद्वितीय, साक्षात् परब्रह्म असलेल्या, स्वतःच उत्पन्न झालेल्या आणि अवतार घेतलेले श्रीरामचंद्र प्रभुच असलेल्या सद्गुरु साईनाथांना मी नमस्कार करतो. हे प्रभो साईनाथा ! तुमच्या दर्शनाने मी अत्यंत पवित्र झालो आहे.

( शार्दूलविक्रीडित )

( श्री-साई-ईश ) ( अखिल-नृणां )

श्रीसाईश कृपानिधेऽखिलनृणां, सर्वार्थसिद्धिप्रद ।
युष्मत्पादरजःप्रभावमतुलं, धातापि वक्ताऽक्षमः ॥
सद्भक्त्या शरणं कृतांजलिपुटः, संप्रापितोऽस्मि प्रभो ।
श्रीमत्साइपरेशपादकमलान्, नान्यच्छरण्यं मम ॥ ९ ॥

( युष्मत्-पाद-रजः-प्रभावम्-अतुलं ) ( धाता-अपि ) ( वक्ता-अक्षमः )
( श्रीमत्-साई-परेश-पाद-कमलात् ) ( न-अन्यत्-शरण्यं )

हे कृपासागरा श्री साईनाथा ! सर्व लोकांच्या सर्व इच्छा सफल करा. तुमच्या चरण-रजाच्या अतुल पराक्रमाचे वर्णन ब्रह्मादेखील करण्यास असमर्थ आहे. हे प्रभो ! सद्भक्तीने हात जोडून मी शरण आलो आहे. देवाधिदेव श्री साईनाथांच्या चरण-कमलांशिवाय मला दुसरे आश्रयस्थान नाही.

( त्रिष्टुभ् )

( भक्त-काम-विबुध ( देव )-द्रुमं )

साइरूपधरराघवोत्तमं, भक्तकामविबुधद्रुमं प्रभुम् ।
माययोपहतचित्तशुद्धये, चिंतयाम्यहमहर्निशं मुदा ॥ १० ॥

( मायया-उपहत-चित्त-शुद्धये ) ( चिंतयामि-अहम्-अहर्निशं )

साईरूप धारण करणाऱ्या रघुकुलातील श्रेष्ठ अशा श्रीरामचंद्राचे व भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारा कल्पवृक्ष असलेल्या प्रभूचे, मायेने पछाडलेल्या ( माझ्या ) चित्ताच्या शुद्धीसाठी, मी रात्रंदिवस चिंतन करतो.

( शरद्-सुधांशु-प्रतिम-प्रकाशं ) ( कृपा-आतपत्रं ( छत्री ), )

शरत्सुधांशुप्रतिमप्रकाशं, कृपातपत्रं तव साइनाथ।
त्वदीयपादाब्जसमाश्रितानां, स्वच्छायया तापमपाकरोतु ॥ ११ ॥

( पाद–अब्ज कमळ )

हे साईनाथा! शरदऋतुतील चंद्राप्रमाणे चकाकणारी तुझी कृपारूपी छत्री आपल्या छायेने तुझ्या चरणकमलांचा आश्रय घेणाऱ्यांचा ताप ( दुःख ) हरण करो.

( स्तवैः–मया–उपासनिना )

उपासनादैवतसाइनाथ, स्तवैर्मयोपासनिना स्तुतस्त्वम्।
रमेन्मनो मे तव पादयुग्मे, भृङ्गो यथाब्जे मकरंदलुब्धः ॥ १२ ॥

( माझ्या ) उपासनेचे दैवत असलेल्या श्री साईनाथा! मज उपासनीकडून ( म्हणजे स्वतः उपासनी महाराजांकडून ) तुझी स्तुती करून पूजन झालेले आहे. मधूने मोहित झालेला भुंगा जसा कमळामध्ये रमतो तसे माझे मन तुझ्या चरणद्वयी रमो.

( जगती )

( अनेक–जन्म–अर्जित ) ( भवेत्–भवत्–पाद–सरोज–दर्शनात् )

अनेकजन्मार्जितपापसंक्षयो, भवेद्भवत्पाद सरोजदर्शनात्।
क्षमस्व सर्वानपराधपूंजकान्प्रसीद साईश गुरो दयानिधे ॥ १३ ॥

( सर्वान्–अपराध–पूंजकान् )

हे दयासागरा ईश्वरा गुरो साईनाथा! तुझ्या चरणकमलांच्या दर्शनाने ( माझ्या ) अनेक जन्मांच्या पापांचा नाश होवो. ( माझ्या ) सर्व अपराध समूहांबद्दल मला क्षमा कर. माझ्यावर प्रसन्न हो.

( वसंततिलका )

श्रीसाइनाथचरणामृतपूतचित्तास्तत्पादसेवनरताः सततं च भक्त्या।
संसारजन्यदुरितौघ विनिर्गतास्ते, कैवल्यधाम परमं समवाप्नुवन्ति ॥१४॥

( दुरित–ओघ ) ( सम्–अवाप्नुवन्ति )

श्री साईनाथांच्या चरणामृताने ज्यांची मने शुद्ध झालेली आहेत व जे भक्तीने त्यांच्या चरणसेवेत सतत मग्न असतात ते ( भक्त ) संसारामुळे उत्पन्न झालेल्या पापांच्या लोंढ्यात खोल बुडलेले ( असले तरी ) परम कैवल्यधामाला पावतात.

(अनुष्टुभ्)

(स्तोत्रम्–एतत्–पठेत्–भक्त्या)

**स्तोत्रमेतत्पठेभ्दक्त्या, यो नरस्तन्मनाः सदा ।**
**सद्‌गुरोः साइनाथस्य, कृपापात्र भवेत् ध्रुवम् ॥ १५ ॥**

हे स्तोत्र जो माणूस सदा मन लावून व भक्तीने म्हणेल तो सद्‌गुरु साईनाथांच्या कृपेला त्वरित पात्र होईल.

**साइनाथकृपास्वर्द्रुसत्पद्यकुसुमावलिः ।**
**श्रेयसे च मनःशुद्ध्यै प्रेमसूत्रेण गुंफिता ॥ १६ ॥**

**गोविंदसूरिपुत्रेण काशीनाथाभिधायिना ।**
**उपासनीत्युपाख्येन श्रीसाइगुरवेऽर्पिता ॥ १७ ॥**

श्रीसाईनाथ कृपारुपी, स्वर्गातील (कल्प) वृक्षाच्या सुंदर पद्यरूपी फुलांची ही माळ शुभवेळी व शुद्ध मनाने प्रेमरूपी धाग्यात उपासनी आडनावाच्या गोविंद यांच्या काशीनाथ नावाच्या मुलाने गुंफिली व श्री साईनाथ गुरुंना अर्पण केली.

---


**विक्रीस तयार !**

र. श्री. पुजारी कृत

## १. श्री साईमहात्म्य (पोथी)

तीन तासांच्या पारायणासाठी उपयुक्त श्रीसाईसच्चरिताचे सारच
अशी पृष्ठे १६८, किंमत ७ रुपये

## २. श्री साईनाथ (गद्य चरित)

श्रीसाईसच्चरिताच्या आधारे लिहिलेले, सोपे, सुंदर
पृष्ठे ३७५, किंमत १८ रुपये

**प्राप्तिस्थान :**

१. गंगवाल बुकस्टॉल, शिरडी
२. जयश्री प्रकाशन, ९९२ सदाशिव पेठ, पुणे – ३०

# भक्तिमार्गातील उत्तुंगतेचे महापर्व
# शिर्डीचे श्री साईबाबा

श्री. सुधाकर सामंत
संपादक, भक्तिसंगम, दादर, मुंबई २८

● साईबाबा ! म्हणजे भक्तिमार्गातील उत्तुंगतेचे महापर्व. साईबाबा म्हणजे साऱ्यांचे मातापिता बंधुसखा साईबाबा म्हणजे शिर्डी नगरीचे भूषण, साईबाबा म्हणजे जीवनाचे महाप्रबोधन. साईबाबा म्हणजे आगळा इतिहास. म्हणूनच प्रत्येक भक्तगण " तुझ्या इशाऱ्याने साँई विश्वाचा हा रथ हाले तुझ्या नामे बाबा साई श्वासोच्छवास माझा चाले " असे म्हणताना आजही दिसत आहे, यातच त्यांची थोरवी आहे.

झालो जरी गतप्राण । वाक्य माझे माना प्रमाण । माझी हाडे तुर्वती मधून । देतील आश्वासन तुम्हास ।। हे बाबांचे वचन आजही भक्तजनानी प्रमाण मानले असून " नित्य मी जाणा हेचि सत्य । नित्य घ्या प्रचित अनुभवे या वचनाचा अनुभव गेली अनेक वर्षे भक्तजन घेत आहेत हीच बाब कितीतरी महत्वाची आहे.

## चरित्र चमत्कारांचे

साईबाबांचे चरित्र हे चमत्कारांचे चरित्र म्हटल्यास वावगे होणार नाही. कारण साईबाबांनी चमत्कार इतके केले आहेत की रोज काही ना काही चमत्कार केल्याविना त्यांची दिनचर्या संपत नसे की काय असे वाटण्याइतके ते मुबलक आहेत.

बाबा शिरडीस आल्यापासून ते समाधी घेईपर्यंत त्यांनी जे चमत्कार केले त्यातील काही सामान्य चमत्कार आहेत. तर काही चमत्कार म णसांची बुद्धी कुंठीत करणारे आहेत. सामान्य सिद्धी प्राप्त झालेला साधू जे चमत्कार करून दाखवू शकतो ते चमत्कार, पुढच्या पायरीवर उभ्या असलेल्या योग्याच्या योगसिद्धी, योगसाधनेने शेवटची पायरी गाठलेल्या म्हणजेच परब्रह्माशी तादाम्य पावलेल्या पुरुषाला प्राप्त झालेले सामर्थ्य हे सर्व प्रकार त्यांच्या चमत्कारातून आढळतातच; पण त्वाही पलिकडेच सामर्थ्य त्यांच्या चमत्कारातून दृष्टिगोचर होते. श्रीसाईसच्चरित्रात हे सर्व चमत्कार ग्रथीत केले असून ते सारे चमत्कार म्हणजे बाबांच्या जीवनाचा एक महत्वाचा भाग आहे.

## दत्तावतारी बाबा

साईबाबांचे चरित्र जसे चमत्कारांचे चरित्र आहे तसेच बाबा हे दत्तावतारी असल्याचेही वदंता आहे. माणिक प्रभू अक्कलकोटचे स्वामी व साईबाबा हे दत्ताव-

तार असल्याचे श्रीसाईसच्चरितात म्हटले आहे. याशिवाय भक्तजनांचीही बाबा दत्तावतार असल्याची श्रद्धा असून त्याचे अनेक दृष्टान्त, अनुभूती आलेली आहे. आतापर्यंत बाबांच्यावर लिहिलेली चरित्रे, अभंग, कविता यातूनही ते दत्तावतारी असल्याचे सूचित केले आहे. त्यांचे जे अनेक चमत्कार आहेत त्यातही दत्तावताराची साक्ष पटते. अक्कलकोटचे स्वामी आणि ते जसे एकरूप असल्याचे दिसून येते तसेच ते दत्तावतारी असल्याचे पटते. दत्त, अवधूत आणि नरसिंह हे जरी गुरुचरित्रात दत्तावतार गणले गेले असले तरी बाबांच्या या अवतारावद्दल कोणाचाही वाद नाही.

## शिर्डीचा कायाकल्प

साईबाबांच्या शिर्डीला आगळे महत्व आहे. तिचा कायाकल्प घडला हे सर्वश्रुत आहे. साईबाबांचे शिर्डीत आगमन झाले, तेव्हाची शिर्डी आणि बाबांच्या कार्याने पावन झालेली शिर्डी यात जमीन अस्मानाचे अंतर आहे.

बाबांनी या नगरीतील लोकांना मोफत औषधे देऊन सुरुवातीच्या काळात रोगमुक्त केले. त्यानंतर त्यांनी औषधाऐवजी उदीने रोग बरे करण्यास प्रारंभ केला. एकदा तर एका कुष्ठरोग्याच्या अंगावरून हात फिरवून तो बरा केला. हा प्रकार पाहिल्यावर मात्र लोक खडबडून जागे झाले आणि सर्वसामान्य माणसापेक्षा काहीतरी विशेष असे या माणसात आहे असे त्याना वाटू लागले.

साईबाबांना प्रथमपासून पणत्या पेटविण्याचा छंद होता. त्यासाठी शिर्डीतील वाण्याकडून ते रोजच्या रोज तेल मागून घेत असत. एके दिवशी दुकानदारांनी तेल नाकारल्यावर बाबांनी स्वसामर्थ्यांनी पाणी ओतून पणत्या पेटविल्या. यामुळे बाबांची ख्याती आणखीन वाढली आणि पुढे पुढे बाबांनी केलेल्या कार्यांमुळे, चमत्कारामुळे त्यांची कीर्ती दाही दिशाना पोहोचली. शिर्डीला प्रशस्त साईमंदिर झाले. त्यात अनेक सुधारणा झाल्या आणि शिर्डीला तीर्थक्षेत्राचे स्वरूप आले.

आज बाबा हयात नसले तरी अजूनही शिर्डीला जाणारी गर्दी काही कमी झालेली नाही पण बाबा हयात असताना होत असलेले चमत्कार, दृष्टीने आजही तितक्याच पद्धतीने होत आहेत. बाबांचा धावा आजही केला तरी बाबा धावून येतात आणि संकट निवारण करतात. अनेकांना ते आपलेसे वाटतात, बाबांच्या प्रती श्रद्धा, भक्ती व्यक्त करताना दिसतात. बाबांच्या विषयी आपले अनुभव, दृष्टांत, व्यक्त करताना दिसतात. यापेक्षा बाबांच्या थोरवीविषयी आणखीन काय ते सांगावे लिहावे.

# शिरडी, शृंगेरी, शेगाव हा सुंदर त्रिवेणी-संगम!

डॉ. अ. का. पाठक
पाठक मठी, १७४ आरे मार्ग
गोरेगाव, (पूर्व) मुं. ४०००६३

● शिरडीचे साईबाबा, शृंगेरीचे शंकराचार्य व शेगावचे गजानन महाराज या तीन महात्म्यांचे कार्य अप्रतिम आहे. शृंगेरी, शिरडी शेगाव ही आजची त्रिस्थळी यात्रा आहे. या तीन संतांचा अभ्यास केल्यास त्यांनी समाज उन्नतीसाठी, कल्याणासाठी महान कार्य केल्याचे दिसून येते. एकतेसाठी त्यांनी जीवाचे रान केले व रानोमाळ फिरले. जगाला एकतेचा संदेश देण्यासाठी जंगलातून फिरत जगले व सामान्य माणसाला जागृत केले. मानवतेचा संदेश दिला.

शंकराचार्यांचे कार्य साईनाथांनी पूर्ण केले. आद्य शंकराचार्य हे शिवाचा अवतार होते तर साईनाथ विष्णूचा अवतार होते. राम-श्याम म्हणजेच भक्तांचे साईराम होते. शैव, वैष्णव, गाणपत्य, आदित्य व शाक्त्य या पंथाना वैदिक सनातन धर्माच्या ध्वजाखाली एकत्र आणण्याचे कार्य शंकराचार्यांनी केले. पण हिंदु व मुसलमान एकत्र आणण्याचे सत्कार्य साईनाथांनी केले आहे. मशिदीत वास्तव्य करून दसरा दिवाळीचे उत्सव त्यांनी साजरे केले. उपेक्षित जनासाठी अनपेक्षित कार्य केले. पुराण व कुराण एकाच ईश्वराचे दोन हात आहेत. शंकराचार्यांनी चालू केलेले समाज-संघटनेचे कार्य आज साईबाबा पूर्ण करीत आहेत. अशा अवतारी विभूतिंचे कार्य त्यांनी जगाचा त्याग केल्यावरच जास्त परिणामकारक होत असते.

जगद्गुरु शंकराचार्यांनी आपल्या मातोश्रीच्या स्नानासाठी पवित्र नदी घराकडे वळवून दारासमोर स्नानाची व्यवस्था केली. तर विश्वगुरु साईनाथांनी आपल्या आवडत्या भक्तासाठी आपल्या पायाच्या अंगुठ्यामधून त्रिवेणी संगमातील तिन्ही पवित्र नद्यांच्या जलधारा निर्माण केल्या. हे दोन्ही महान चमत्कार महात्म्यांच्या अध्यात्मिक शक्तींचा आविष्कार दर्शवितात. किंबहुना प्रत्यक्ष शिवशक्ती व वैष्णवशक्तीचे दर्शन घडवितात. एका संताने बटन दाबून विजली सुरू केली तर दुसऱ्याने विश्वभर प्रकाश निर्माण केला. अपूर्ण कार्य पूर्ण केले.

दक्षिण भारतात पहाटे पुजारी देवीचे देऊळ पूजा करण्यासाठी उघडण्यास जाई तर देवी कोपाने तो मृत्युमुखी पडत असे. जगतगुरु शंकराचार्यांनी देवीच्या कानात ताटके स्थापन करून देवी कोप शांत केला. शिरडीमध्ये पटकी सुरू झाली. देवी-कोप झाला. जात्यात पीठ दळून विश्वगुरु साईबाबांनी गावाभोवती पीठाची रांगोळी काढण्यास सांगितले, व आश्चर्य म्हणजे गावातील पटकीची साथ रोखली. देवी कोप शांत झाला.

श्री शंकराचार्य व श्री साईनाथ ह्यांच्या कृपासामर्थ्यात अशा तऱ्हेने साम्य दिसून येते. विश्ववंद्य साईबाबांचे सामर्थ्य विकसित स्वरूपाचे वाटते. आद्य शंकराचार्य हे आपल्या सद्‌गुरूच्या गुहेचे द्वारपाळ झाले होते. नदीला पूर येऊन पाणी गुहेत प्रवेश करणार होते. पण गुहेत त्यांचे सद्‌गुरु समाधी अवस्थेत होते. आद्य शंकराचार्यांनी सद्‌गुरुंचा समाधी भंग होऊ नये म्हणून पूराचे पाणी ओसरवले. ज्या प्रमाणे शंकराचार्यांनी आपल्या सद्‌गुरुच्या गुहेचे रक्षण केले त्याप्रमाणे साईनाथांनी संपूर्ण जीवनात आपल्या महान गुरुच्या स्थानाचे रक्षण केले आहे.

ह्या तीन चमत्कारपूर्ण घटनेवरून असे सिद्ध होते की जगद्‌गुरु शंकराचार्य व विश्वगुरु साईनाथांच्या कार्यात साम्य आहे. शंकराचार्यांनी शैव-वैष्णव-संगम केला तर साईबाबांनी हिंदू-मुसलमान-संगम निर्माण केला. एवढ्यासाठी सामान्यांनी एका संताचा अभिमान करताना दुसऱ्या संताचा अवमान करू नये. मानवाने एका देवाची भक्ति करताना दुसऱ्या देवाचा राग करू नये सर्व दैवी अवतार हे मानव कल्याणासाठी जगात जन्म घेतात. त्यांचे सर्वांचे ध्येय एकच असते. मानवकल्याण प्रित्यर्थ ते काम करतात, झीजतात व मानवास सुलभ भाषेत मार्गदर्शन करतात. शंकराचार्य व साईनाथ ह्या महान विभूतिना वंदन करून हा लेख समाप्त करतो. ●


श्रीसाईबाबा संस्थान शिरडीचे नवे इंग्रजी प्रकाशन

## साईबाबा ऑफ शिरडी

: लेखिका :

श्रीमती पेरीनबेन एस. भरूचा

पृष्ठे १०६ ] [ किंमत ५

आमच्या मुंबई व शिरडी कार्यालयात विक्रीस उपलब्ध

# मुंबैची श्रीमहालक्ष्मी

— श्री. गणपतराव सामंत एम्. ए.
निवासी व्यवस्थापक–श्री महालक्ष्मी मंदिर ट्रस्ट

● दसरा, दिवाळी हे हिंदूचे सण खूप प्रसिद्ध आहेत. नवरात्र व दिवाळी या सणाच्या दिवशी मुंबईतील सर्व रस्ते जणू महालक्ष्मीलाच जातात असे वाटते. दर मंगळवार, शुक्रवार, रविवार व इतर सुटीचे दिवशी श्रीमहालक्ष्मी दर्शनार्थ फारच गर्दी असते, व आता तर ही गर्दी दररोजच होत असते. कसल्याच प्रकारची प्रसिद्धी नसताना श्री महालक्ष्मी सर्वांना आपल्या तेजाने, सामर्थ्याने आपल्याकडे खेचत आहे. मुंबईच्या भेटीत श्रीमहालक्ष्मी दर्शन घ्यावयाचे असा बाहेरील भाविकांचा मनोदय स्पष्ट होतो. याचा साधा आणि स्पष्ट अर्थ म्हणजे श्रीमहालक्ष्मी नवसास पावते हाच होय. अशा या सुप्रसिद्ध श्री महालक्ष्मीचा संक्षिप्त इतिहास भाविकासाठी द्यावा लागत आहे.

एतेभ्य एव स्थानेभ्यस्तिस्त्र आसंश्च शक्तयः। तत्रासीत्तामसी दुर्गा सावित्री राजसी तथा। सात्त्विकी श्रीश्चेति सर्वा वस्त्रालंकारशोभिताः

परमात्म्याच्या नाभिकमल, हृदयकमल आणि भालप्रदेश या तीन स्थानांपासून तीन शक्ति निर्माण झाल्या. तमोगुणयुक्त दुर्गा, रजोगुणयुक्त सावित्री आणि सत्वगुण युक्त लक्ष्मी या त्या तीन शक्ति होत. या शक्ति, सर्वप्रकारची सुंदर वस्त्रे व अलंकार यांनी विभूषित होत्या,

ता वैराजाज्ञया त्रींस्तान् ब्रह्मादीन्प्रतिपेदिरे। दुर्गा रुद्रं च सावित्री ब्रह्माणं विष्णुमन्तिमा ॥

विराट् पुरुषाच्या आज्ञेने या शक्ति ब्रह्मादि देवांना प्राप्त झाल्या. यामध्ये शंकराला, पार्वती सावित्री ब्रह्माला आणि लक्ष्मी विष्णूला प्राप्त झाली.

वरील तीन प्रमुख शक्तींपासून दुसऱ्याहि पुष्कळ शक्ति निर्माण झाल्या—

चण्डिकाद्याश्च दुर्गाया अंशेनासन्सहस्रशः।
त्रयीमुख्याश्च सावित्र्या शक्तयोंऽशेन जज्ञिरे।
दुःसहाप्रमुखा चासन्नंशेनेवै श्रियो मुने ॥

चंडिका वगैरे हजारो शक्ति दुर्गेच्या अंशापासून उत्पन्न झाल्या. दुसऱ्या तीन महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती ) मुख्य शक्ति सावित्रीच्या अंशापासून

झाल्या. दु:सहा ज्यामध्ये मुख्य आहे अशा इतर शक्ति लक्ष्मीच्या अंशापासून उत्पन्न झाल्या.

( वरील माहिती श्री पुरुषोत्तम गीतेच्या आधारे दिलेली आहे. )

महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती यांचा त्रिवेणी संगम म्हणजेच मुंबैची ॥ श्री महालक्ष्मी ॥

हिंदूचे हे पवित्र देवस्थान टेकडीवर असून पूर्वाभिमुख आहे. पश्चिमेस अथांग अरबी समुद्र व जणू काय तो थोपवण्यासाठी व श्रीमहालक्ष्मीचे संरक्षणार्थ दर्या हनुमान व श्री गणपती ठाकले आहेत. दक्षिणेस श्री अक्कलकोट महाराज मंदिर, पूर्वेस सुप्रसिद्ध श्री धाकलेश्वर मंदिर व उत्तरेस हाजी अल्ली व श्री मार्कंडेश्वर मंदिर.

अठराव्या शतकात वरळी कॉजवेचे काम हाती घेण्यात आले पण वारंवार अडथळे निर्माण होऊन कामात प्रगति होईना. निसर्गाने काम थांबविले. ठेकेदार हताश झाले. अशाच परिस्थितींत मानवी प्रयत्न थकले असताना एका प्रभु ठेकेदाराच्या स्वप्नात श्री महालक्ष्मीने दृष्टांत देऊन आपणास व बहिणीस समुद्रातून बाहेर काढण्यास सांगितले. या मूर्ति समुद्रात मिळाल्या व नंतर कॉजवेचे काम सुरु होऊन अडथळे न येता पूर्ण झाले व श्री महालक्ष्मीची श्री महाकाली व श्री महासरस्वती समवेत स्थापना झाली. उपलब्ध माहितीनुसार या श्री महालक्ष्मी मंदिरास २५० वर्षे पूर्ण झाली व असंख्य भक्तांच्या प्रेमामुळे ती प्रसन्न होऊन नवसास पावणारी श्री महालक्ष्मी बनली. एकीकडून जनसागर व दुसरीकडून अरबी सागर अशा दोघांच्या सुवर्णमध्यांने श्री महालक्ष्मी आपल्या तेजाने तळपत आहे.

श्री महालक्ष्मी मंदिर ट्रस्टची श्री दर्या हनुमान व श्री गणपती अशी दोन मंदिरे तेथेच समुद्राजवळ आहेत. अशा या नवसास पावणाऱ्या दर्या हनुमानची माहिती अगोदरच प्रसिद्ध झाली. या दर्या हनुमान मंदिरावर एकदा वीज कोसळली. पुजारी मंदिरात पूजेत मग्न होता. काहीच अपाय झाला नाही. पूज्य श्रीधरस्वामी येथील लोकास म्हणाले की हा दर्या हनुमान जागृत आहे व श्रीमहालक्ष्मीचा रक्षक आहे. जेथे पुजारी राहतात तो भाग एकदा अचानक कोसळला पण मनुष्यहानी तर नाहीच पण कसलेही नुकसान झाले नाही. श्रीमहालक्ष्मी मंदिरावर पहाटे धाडसी दरोडा पडला पण दरोडेखोर सापडले. यावरून पूज्य श्रीधरस्वामींच्या उद्‌गाराच्या सत्यत्वाची प्रचिती येते.

भक्तगण नवसास पावणाऱ्या या माताजीस सोन्या-चांदीच्या छत्र्या, पाळणे देतात. या वस्तू मुबलक प्रमाणात येत असतात. त्याचप्रमाणे अंगठ्या, नथी वगैरे

दागिनेही येत असतात. अनेक वर्षे सातत्याने येणारे भक्त पाहिले की मन हेलावून जाते.

दसरा-दिवाळी या सणांच्या वेळी जनसमुदाय थोपविणे मुष्किलीचे होते. भक्तगणांच्या सोईसाठी विश्वस्थ मनःपूर्वक प्रयत्न करीत आहेत व म्हणूनच हे मंदिर आता नूतनीकरणाच्या वाटचालीवर आहे. नूतनीकरण चालू असताना भक्तगणांची गैरसोय वाढणार पण ती गैरसोय पुढच्या सोईसाठी भक्तगण सहन करतील याची खात्री आहे.

इ. स. १७६१ ते १७७१ या काळात मंदिराची स्थापना झाली. या मूर्ति पुरातन असाव्यात कारण परकीयांच्या हल्ल्यापासून संरक्षण करण्यासाठी त्या समुद्रात विसर्जित केल्या होत्या. श्रीमहालक्ष्मीच्या उजवीकडे श्रीमहाकाली व डावीकडे श्रीमहासरस्वती या बहिणी आहेत. नवरात्रीत देवींचे मुखवटे क्षणाक्षणाला बदललेले भासतात. नवनाथ ग्रंथात श्रीमहालक्ष्मीचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे कोल्हापूरची श्री महालक्ष्मी व मुंबैची श्रीमहालक्ष्मी यांचाही बराच संबंध आहे. यावर सध्या संशोधन चालू असून लवकरच ती माहिती प्रसिद्ध होणार आहे.

सध्या फिल्म विभाग, सूचना व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारतर्फे मुंबैच्या श्रीमहालक्ष्मीची फिल्म तयार होत असून ती सर्व ठिकाणी 'सिंदूर' या नावाने दाखविली जाईल. सुप्रसिद्ध श्री तिरुपती देवस्थानचे काही अधिकारी यांनी या मंदिरास भेट देऊन वाढत्या लोकप्रियतेचा अनुभव घेतला व कारभाराविषयी प्रशंसोद्गार काढले. एक सुप्रसिद्ध इतिहासकार 'महाराष्ट्रातील देवालये' पुस्तक लिहित आहेत व तूर्त त्यांचे संशोधन चालू आहे. श्री महालक्ष्मी ट्रस्ट याबाबतीत पुस्तक प्रसिद्ध करण्याच्या विचारात आहे, तर वाचकास या मुंबैच्या श्रीमहालक्ष्मीची माहिती असल्यास अवश्य पाठवून द्यावी. अनुभवही कळवावे.

राष्ट्र निधर्मी असले तरी प्रत्येकास धर्म हा प्राणांपेक्षा प्रिय असतो. कोणताही धर्म न पाळणे म्हणजे निधर्म नव्हे तर आपला धर्म आपण पाळून इतरांसाठी त्यांचा धर्म पाळण्यास व्यत्यय न आणणे म्हणजे निधर्म. कायद्याने निधर्मी राष्ट्र होऊ शकत नाही. श्री साईबाबांकडे सर्व धर्मांचे भक्तगण येत असत. ते हिंदूचे दसरा, दिवाळी गोकुळअष्टमी रामनवमी साजरी करीत तद्वतच मुसलमानांचे मोहरम, ताबूत साजरे करीत. आपला धर्म सोडण्याची त्यांनी कोणासाही शिकवण दिली नाही तर सर्व धर्मीयांचा सलोखा राखण्याचे प्रयत्न केले.

मुंबैच्या श्री महालक्ष्मीच्या दर्शनार्थ सर्व धर्मीय लोक येतात. मंदिरात दुजा भाव नाही. मंदिरात स्पृश्य अस्पृश्य भेद नाही, भक्तिभावाने आलेल्या भक्तास देवी पावते याची हजारो उदाहरणे आहेत. माणसाने दगडातून मूर्ति निर्माण केल्या व भक्त गणांनी आपल्या प्रेमाने या दगडाच्या मूर्तिस चैतन्य निर्माण केले. दगडातुन देवत्व निर्माण झाले.

अशा या नवसास पावणाऱ्या मुंबैच्या श्रीमहालक्ष्मीस शतशः प्रणाम.


**A VERY FAST SELLING NOVEL**

The Best ever book on SAI BABA'S Life!

# "A MISSION DIVINE!"

Price Rs. 45.00 : Postage Rs. 4.50 : (No V.P.P.)

Order Your Copy direct from Publishers :
'PRASHANTI PRAKASHAN', 5, Vasant Apartments,

Plot 47, Kastur Park, Shimpoli Road,
BORIVALI (W), Bombay 400 092.

☆

# साईबाबांचा विनोदप्रचूर उपदेश

—डॉ. रा. सी. कापडी, एम. बी. बी. एस.
साईप्रसाद, राजारामपुरी १३ वी गल्ली,
कोल्हापूर

● शिर्डीच्या साईबाबांचे शिक्षण किती झाले होते, त्यांना संस्कृत, इंग्रजी वगैरे भाषांचे ज्ञान होते काय ? त्यांनी कविता, ओव्या, श्लोक, अभंग वगैरे इतर संताप्रमाणे केली आहेत काय ? ज्याअर्थी त्यानी लिहिलेली किंवा लिहून घेतलेली पुस्तके प्रसिद्ध नाहीत त्याअर्थी वरील प्रश्नांचे उत्तर त्यांच्या जन्माप्रमाणेच अगम्य आहे. त्यांचे गुरु कोण होते हेसुद्धा सांगणे कठीण आहे.

तरीपण ते सर्वज्ञ होते. ते नैसर्गिक ज्ञानसंपन्न होते. अलौकिक सर्वोतकृभावना संपन्न होते. त्यांना सर्व भाषेचे ज्ञान होते. हे निरनिराळ्या घटनांच्यावेळी त्यांनी जो सदुपदेश केला आहे त्यावरून सिद्ध होते. तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया। उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः ॥ या भगवत् गीतेतील चौथ्या अध्यायातील चवतीसाव्या श्लोकावर त्यांनी आतापर्यंतच्या प्रकांड पंडितांनी केलेल्या भाष्याच्या चाकोरीबाहेर जे भाष्य केले आहे त्यावरून त्यांच्या संस्कृतच्या अगाध ज्ञानाची कल्पना येते. कधी दृढ मौनधारण। हेंच जयांचे ब्रह्मव्याख्यान कधी चैतन्यआनंदघन। भक्तगण परिवेष्टित ॥ कधी गुढार्थध्वनीत बोलणे। कधी थट्टेने विनोद करणे। कधी संदिग्धता सोडून देणे। काताबणे चालावे ॥ कधी भावार्थे कधी विवेक। कधी उघडे निश्चयात्मक। असे अनेकी अनेक। उपदेश करीत ते ॥

यातील कधी थट्टेने विनोद करणे। याच ओवीच्या आधारे बाबांनी जो उपदेश केला आहे तोच मी या लेखात ग्रथीत करणार आहे.

इंद्रियस्येन्द्रिय स्यार्थे राग-द्वेषौ व्यवस्थिती भगवत्‌गीता ३/३४
तयोर्न वशमागच्छेतौ ह्यस्य परिपन्थिनौ ॥

भावार्थ : प्रत्येक इंद्रियाची विशिष्ट आवड निवड असते. त्या आवडीनिवडीच्या ताब्यात आपण जाऊ नये. कारण त्या मुमुक्षुच्या आड येणाऱ्या आहेत. याचाच पावसच्या स्वामी स्वरुपानंदानी अभंगवाणीत खालीलप्रमाणे अनुवाद केला आहे.

आपआपुले विषय सेविती सर्व इंद्रिये जाण।

विषयी प्रीति-द्वेष होती स्वभावता निर्माण। परंतु तुझे कधी तयाच्या आहारी नच जावे पथी चोरटे ओळखुनि ते अंतर्निष्ठ रहावे.

डोळ्यानी पहाणे, कानानी ऐकणे, नाकाने वास घेणे, जीभेने चव घेणे वगैरे इंद्रियांचे स्वभावधर्म आहेत. डोळे जसे सौंदर्य पहाते तसे ते कुरुपताही पहातात. एखाद्या कुरुप माणसाचा चेहरा पाहून माणूस नाक मुरडतो. तसा एखाद्या लावण्यवतीचे सौंदर्य पाहून घायाळ होतो. कुरुप स्वरुप तटस्थपणे–अपरोक्षपणे पहाणे, मन चंचल न होऊ देणे, विषयांध न बनणे हेच मुमुक्षुचे मोक्षाचे साधन असते. साईबाबांनी आपल्या एका भक्ताला हा उपदेश विनोदप्रचूर भाषेत एका घटनेच्यावेळी कसा केला हे पहाणे फारच मनोरंजक आहे.

शिर्डी येथे बाबांचे दर्शन घेण्याकरिता कधीकधी अलोट गर्दी जमते. सणासुदीच्या दिवशी तर दर्शनोत्सव लोकांची रीग लागलेली असते. अशाच एका गर्दीच्या वेळी बाबांच्या चरणस्पर्शसुखाचा आनंद मिळावा म्हणून गोषातील एक लावण्यवती पुढे सरकली. त्याचवेळी एका भक्ताची बाबांचे चरण चुरण्याची ( पाद संवाहन ) सेवा चालली होती. गोषातील त्या बाईने बाबांजवळ येताच गोषा दूर सारला आणि बाबांच्या चरणावर साष्टांग नमस्कार घातला. पाय चुरणारा भक्त तिचे ते दिव्य लावण्य पाहून स्तंभित झाला. बाबांची सेवा तशीच राहिली. तिच्या सौंदर्याने तो घायाळ झाला. तो तिच्या नजरेला नजर भिडवू शकला नाही. लज्जीत होऊन मान खाली घातली, आणि उठण्याचा प्रयत्न करू लागला. बाबांनी हे ओळखले. त्यांनी त्याचा हात धरून त्याला खाली बसविले.

ती सौंदर्यवती गेल्यावर बाबांनी भगवत् गीतेतील तिसऱ्या अध्यायातील ३४ व्या श्लोकाच्या आधारे एक प्रवचन झोडले.

परमेश्वराने डोळ्यानी सौंदर्याचा आस्वाद घेण्याकरताच जग निर्माण केले आहे. डोळ्यासारख्या इंद्रियाला जिथं जिथं सौंदर्य दिसेल तिथं तिथं थांबून डोळ्याची मनसोक्त तृप्ती होईपर्यंत ते पाहू दे. इंद्रियाचे काम इंद्रियाला करू दे. सौंदर्याकडे पाहून डोळे दिपले व ते मुद्दाम झाकून घेतले तर ईश्वराने निर्माण केलेल्या कृतीकडे कोण पहाणार ? विधात्याने त्या गोषातील स्त्रीप्रमाणे कमनीय सौंदर्य–इतके चालते बोलते सौंदर्य निर्माण केल्याबद्दल विधात्याला धन्यता द्यायला नको का ? एखाद्या शिल्पकाराने दगडावर कोरून, आपली सर्व कुशलता पणास लावून सौंदर्याचा नमुना म्हणून एखादे शिल्प तयार केले व ते सर्वोत्कृष्ट ठरले, तर पहाण्यासाठी लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्या ठिकाणी खेचल्या जातात ना ! मग त्या गोषातील चालते बोलते सौंदर्य तुमच्याकडे चालून आले तर त्याचा गौरव करायला पाहिजे. सत्कार करायला पाहिजे. डोळे झाकून माना खाली घालून त्या सौंदर्याचा अनादर का करता ? विकाररहीत डोळयांनी पहा. विषयांध नजरेने पाहू नका. असले सौंदर्य निर्माण केल्याबद्दल विधात्याची तारीफ करा.

शिवाजी महाराजापुढे कल्याणच्या सुभेदाराची सून उभी करण्यात आली. त्यावेळी छत्रपतीनी काय उद्‌गार काढले माहित आहे ना! तुमच्यासारखी माझी माता जर स्वरूपवान असती तर मी सुद्धा तुमच्यासारखा सुंदर निपजलो असतो. महाराजांनी त्या स्त्रीला मातेची उपमा दिली. तिचा चोळी लुगडे देऊन सत्कार केला व तिला घरी मानाने पोहोचवती केली. छत्रपती सारखी सर्वांनाच ही दृष्टी एकाकी येणार नाही. परंतु डोळ्याला डोळा भिडवून पहाण्यास शिका. तुमची वृत्ती हळूहळू बनता बनता बनेल. विकाररहीत बनेल. मुमुक्षीनी सर्वाभूते परमेश्वर पहाण्यास शिकले पाहिजे. वरील घटनेवरून बाबांचे आपल्या भक्ताच्या आध्यात्मिक उत्कर्षासाठी किती बारीकसारीक लक्ष असते हे दिसून येईल.

**घटना दुसरी :**

साईबाबा विनोदाचे आगर होते. खालील एका घटनेवरून त्यांची उपदेश करण्याची मार्मिकता दिसून येईल.

एकदा एक वयस्क वेणूबाई कौजलगी नावाची बाई बाबांचे पोट रगडीत होती. दुसऱ्या बाजूला एक वावरे नावाचा म्हातारा बाबांची कमर दाबीत होता. भक्तानी श्रद्धेने केलेल्या सेवेत जर कोणी अडथळा आणला तर बाबा क्षुब्ध होत असत. जशी ते सेवा करतील तशी ते करून घेत. इतरानी बरेवाईट कोणतेही नाव ठेवलेले त्यांना आवडत नसे. दोघांची सेवा जोरजोराने चालली होती. सेवेला उधाण आले होते. सेवेच्या कैफात त्या दोघांच्या शरीराची हालचालही वेगाने चालली होती. बाबांच्यासमोर त्या दोघांची डोकी जवळ येत होती. सेवा ऐन रंगात आली असता दोघांची डोकी एकमेकावर आपटत होती. साहजिकच दोघांचे मुखवटेही जवळ येत होते. ती वयस्क बाई मोठी विनोदी होती. ती थट्टेने म्हणाली "बाबा पहा. हा म्हातारा माझे मुके घेऊ पहातो" तिचे हे उद्‌गार दुसऱ्या बाजूच्या म्हाताऱ्याला चांगलेच झोंबले, तो रागाने मोठ्याने ओरडला, 'ये बाई काय बोलतेस याचे भान आहे का तुला? माझ्यासारखा थेरडा असले चाळे करील तरी काय? शरम नाही वाटत असला घाणेरडा आरोप करायला! बाबांची सेवा राहिली बाजूला. या दोघांचे कडाक्याचे भांडण जुंपले. बाबांना आता मध्यस्थी कराविशी वाटली. बाबा म्हणाले अरे! असा हमरीतुमरीवर का येतोस? आई नाही का मुलाचे पापे घेत. जमलेल्या भक्तवृंदांच्या घोळक्यात टाळ्यांचा गजर झाला. हास्याचा कल्लोळ उडाला.

**घटना तिसरी :**

एका संध्याकाळी साईबाबा मशिदीत आपल्या आवडत्या विटेवर हात ठेवून योगसाधनेत गुंग असता नेहमीप्रमाणे बाबांचा उपदेश ऐकण्यास भक्तांचा घोळका

जमू लागला. इतक्यात दास गणूंची स्वारी डोकीला फेटा, गळयाभोवती जरीकाठी उपरणे, लांब अंगरखा, रेशीम काठी नवीनच घडी मोडलेले पायघोळ धोतर नेसून कीर्तनकाराच्या पेहरावात नेहमीप्रमाणे बाबांची अनुज्ञा घेण्याकरिता आले. बाबां-पुढे दासगणू दर्शनाकरता वाकताच बाबा म्हणाले 'वाहवा! चांगला नवरदेवा-सारखा सजला आहेस! कोठे चालले हे नवरदेव?' श्रोतृवृंदांत हास्याची लकेर घुमली. दासगणू ओशाळले. 'शिरडीच्या लोकांनी कीर्तनाचा नारळ दिला आहे. कीर्तन करण्यास निघालो आहे.' 'आणि या नवरदेवांच्या थाटात? छेः छेः आप-णास नको हे अवडंबर! उतर उतर हे ओझे, अरे कीर्तन ही नारदीय गादी! नार-दाचा वेष तू नाटकात तरी पाहिला आहेस ना? अधोभाग अर्धवस्त्राने आच्छादलेला, गळयात माळ, सर्व अंग उघडे, हातात चिपळया, काखेत वीणा आणि कासेला पंचा, मुखी हरीनामाची गर्जना! एवढेच साहित्य कीर्तनाला पुरे. त्रिभूवन धुंडणारा नारद ह्याच वेषात पाहिजे तिथे कीर्तन करीत असे. ह्या तुझ्या वेषात आणि साथीला, तबला पेटीची साथ घेऊन कीर्तन करणे म्हणजे कीर्तनाची थट्टाच आहे. अशा कीर्त-नाला जमणारे श्रोतेही त्याच दर्जाचे असणार! कोणाला आवड गाण्याची, कोणाला हरीदासाच्या नकलाची! कोणाला तबल्याच्या ठेक्याची!' बाबांचा हा विनोद प्रचूर उपदेश ऐकून बाबांच्यासमोर दासगणूनी कृत्रीम कीर्तनकाराचा पोशाख तात्काळ उतरला. येथपासून गणूदासांची आमरणान्त उघडे नारदीय थाटात कीर्तने होऊ लागली. गणूदासांनी स्वयंरचित आख्याने घेऊन सर्व ठिकाणी, विशेषतः कोकणप्रांती मुंबई, ठाणे, कल्याण, वसई वगैरे प्रांतात शेकडो कीर्तने केली. श्रोतृवृंदांचीही हजा-रोंची गर्दी होऊ लागली. साई महिमा मुंबई व कोकण प्रांती दासगणूंच्या कीर्तनानेच चौफेर पसरला. गणूदास महाराजाना रिटायर्ड मामलेदार चांदोरकर यांनी साथ दिली.

### घटना चौथीः

एकदा हरी कान्होबा या नावाचे एक श्रीमंत गृहस्थ साईबाबांची परीक्षा पाहाण्याकरता मुद्दाम शिरडीला आले. श्रीमंतीचा तोरा मिरविण्याकरीता त्याचा पोषाखीचा थाटसुद्धा ऐटबाज होता. डोक्याला जरीचा फेटा पायात जरीने मढविलेले करकरीत कोरे पादत्राण दर्शनाला आल्यावर त्याने पायातील वहाणा मशीदीच्या एका कोपऱ्यात सुरक्षित ठिकाणी ठेवल्या. साईबाबा जात्याच विनोदी! त्यांनी ह्या हरी कान्होबाची गंमत करावयाचे योजले. दर्शन घेऊन खाली उतरताच तो पादत्राणे उचलण्यासाठी खाली वाकला पण पादत्राणे कुठे आहेत? त्याने बरीच शोधाशोध केली. एवढ्या प्रचंड गर्दीत कोणाला विचारावे हासुद्धा त्याला प्रश्न पडला. शेवटी निराशेने भोजनगृहाकडे वळला. भोजनाकडे त्याचे लक्ष लागेना डोळयापुढे

पादत्राणाशिवाय दुसरे काहीच दिसेना. इतक्यात एका काठीवर पादत्राणाचा बावटा लावून एक मुलगा 'हरीचा बेटा, जरीचा फेटा, असेल त्याने जरुर भेटा,' असा पुकारा करीत असलेला आढळला. कसे तरी मुखमार्जन करून हा हरीभाऊ त्याच्याकडे धावतच गेला. आपली पादत्राणे त्याने ओळखली. गयावया करून मुलाकडून ती मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु तो मुलगा मख्ख भेटला. तो म्हणाला बाबांनी मला सांगितले आहे की जो आपला जरीचा फेटा दाखवून हरीचा बेटा म्हणून खूण पटवून देईल त्यालाच ह्या वहाणा दे. हरीभाऊ काखेत मारलेला जरीचा फेटा दाखवून म्हणाला मीच तो हरीचा बेटा. माझ्या बाबाच नाव कान्होबा म्हणजे हरीच। दे त्या मला वहाणा। मुलगा म्हणाला. अशा नाही मिळायच्या. साग्रसंगीत खूण पटलेली पाहिजे. चल माझ्याबरोबर तिकीट ऑफिसात. भोजन तिकीट घेताना मी सही केली ती पाहून तरी तुझी खात्री पटेल. मुलाने सही पाहून वहाणा त्याच्या अंगावर फेकल्या. चार चौघात वहाणा मारल्याप्रमाणेच त्याची फजिती झाली. तो मनात म्हणाला माझा जरीचा फेटा सर्वांना दिसतोच आहे परंतु मीच हरीचा म्हणजे कान्होबाचा बेटा हे बाबांना कसे समजले ? बाबा अंर्तज्ञानी आहेत असे जे लोक सांगतात तेच खरे. तो तसाच तडक बाबांकडे मशिदीत गेला आणि साष्टांग नमस्कार घालून अहंकारगलीत होऊन त्याने बाबांची प्रार्थना केली. बाबा माझ्याकडून अक्षम्य अपराध घडला. बालकाला पदरात घ्या.

ह्या घटनेमुळे तीन गोष्टी साधल्या. हरीभाऊचा तोरा उतरला. तो शिर्डीचा कायमचा वारकरी बनला बाबा अंर्तज्ञानी आहेत याची साक्ष पटली.

## घटना पाचवी

एकदा बाबा मशिदीत भक्ताबरोबर गप्पा मारीत बसले होते. इतक्यात भिंतीवर बसलेली पाल चुकचुकली. एक भक्त म्हणाला " बाबा। ही पाल का बरे चुकचुकते ? काहीतरी अशुभ घडणार नाहीना ? दुसरा भक्त म्हणाला पालीची कारीका पाहा अन् मग कायते ठरवा. पाल अंगावर पडली तरच कारीका पहातात तिसरा म्हणाला शुभ अशुभही पाहाता येते. चवथा म्हणाला पालीची कारीकाच कशाला ? बाबांनाच विचारा. पाचवा म्हणाला बाबा ही पाल का बरे चुकचुकते ? बाबा म्हणाले " अरे ती आपल्या बहिणीची वाट पाहातेय तिची बहिण औरंगाबादहून आज येणार आहे. तिची ती मार्गप्रतीक्षा करते " सगळे लोक हसू लागले सर्वांना वाटले बाबा नेहमीप्रमाणे थट्टाच करीत आहेत.

बाबांनी पाहिले की हा प्रसंग खेडुतांची खुळचट कल्पना घालविण्यास बरा आहे बाबा म्हणाले असे हंसता काय ? खरोखरीच ती बहीणीची वाट पाहात आहे.

मांजर आडवे येणे, कुत्रे रडणे, घुबड ओरडणे, कोणी, बोलत असता शिंकणे ह्या निसर्ग निर्मित क्रिया आपण जर शुभाशुभ प्रसंगाशी जोडू लागलो तर प्रत्येक घडीला आपला कामधंदा सोडून कुडबुड्या जोतीषाकडे धावावे लागेल. खरोखरीच ती आपल्या बहिणीची वाट पहात आहे. आता येईल ती. बाबांचे हे विनोदप्रचूर भाषण ऐकून हास्याची पुनः एकदा खसखस पिकली.

इतक्यात एक सौदागर घोडीवरून उतरला आणि घोडीसाठी चंदा आणण्यास तोबरा झाडला त्याबरोबर एक पाल खाली पडली. बाबा म्हणाले हीच ती चुकचुकत असलेल्या पालीची बहिण ! तीच्यावर नीट नजर ठेवा. पाल जी तडक निघाली तीं भिंतीवरील पालीच्या रोखाने धावली जणु काय अनेक वर्षे गाठ न पडलेल्या बहिणी बहिणीप्रमाणे त्या एकमेकींची चुंबने घेऊ लागल्या. उभ्या आडव्या गिरक्या मारून त्यांनी आनंदोत्सव साजरा केला. एक भक्त जास्त चिकित्सक होता त्याने त्या घोडे-स्वाराला विचारले " आपण कोठून आलात ? कोठे जायचे ? सौदागर म्हणाला मी औरंगाबादेहून आलो. मला पुढे जायचे आहे. बाबांचं दर्शन घेऊन घोडीला हरभरे चारून पुढे जाईन ' औरंगाबादेहून ' हा शब्द ऐकताच बाबांचा शब्द खरा झाल्या-बद्दल इतरांनी टाळ्या वाजवून आनंद प्रदर्शीत केला. प्रश्न पुसणाऱ्या गृहस्थाचा मात्र जोडा मारल्यासारखा चेहेरा पड़ला.

या घटनेमुळे बाबांच्या अंतर्ज्ञानाची पुनः एकदा खात्री पटली. बाबांच्या औदार्याचा ठसा भक्तांच्या अंतःकरणावर कायमचा उमटला. पालीसारख्या क्षुद्र प्राण्यांचे परस्परावरील प्रेम दृगोचर झाले. पालीच्या चुकचुकणाऱ्या नैसर्गिक क्रियेच्या अंधश्रद्धेवर विसंबून राहणे किती मूर्खपणाचे आहे हा धडा बाबांनी हसत हसत शिकविला.

बाबांच्या सत्‌चरित्राचे पारायण करणाऱ्या भक्तांना वरील प्रमाणे अनेक घटना ठिकठिकाणी पानापानावर आढळतील मात्र भक्तांची सुद्धा मनोवृत्ती विनोद ग्रहण करणारी पाहिजे.

☆ ☆ ☆

# श्रीसाई-सुधा

–श्री. बाळकृष्ण अ. देसाई
१५१ गोखले रोड, भांगरवाडी,
लोणावळा, ४१०४०१ ( पूर्व )

* गेल्या सात आठ महिन्यातील ही प्रत्यक्ष घडलेली गोष्ट. माझ्या अगदी निकटच्या आप्ताला झालेला साक्षात्कार. सदर गृहस्थ डबल ग्रॅज्युएट असून उत्तम लेखक नि कवीहि आहेत. तसेच ते राजकीय कार्यकर्तेही आहेत. देव मानणारे असले तरी ऊठ–बस देव देव करणारे नाहीत. त्यांना घडलेले हे बाबांचे दृष्टांत.

गोपाळरावांना कुणी नव्या ८० सालचे साईबाबांचे कॅलेंडर दिले. उजवा हात आशीर्वादादाखल उभारलेला. त्यातून प्रकाशशलाका वाहते आहे. ते कॅलेंडर त्यानी आपल्या घरी उंच ठिकाणी लावून ठेवले.

हा वेळपावेतो गोपाळरावांनी फक्त साईबाबांची कीर्ति ऐकली होती. त्यांच्या ठिकाणी भक्तीने मान लवविली नव्हती, की शिरडी स्थानाकडे धाव घेतली नव्हती.

कॅलेंडर लावून दोन दिवस झाले. सकाळी उठून त्यांनी साईबाबांच्या प्रतिमेकडे नजर टाकली. तो काय चमत्कार ! त्यांच्या फोटोवर कुणीतरी वर्तुळाकार तांबड्या रेघा रेखाटलेल्या त्यांना दिसल्या. मग गोपाळरावांनी आपल्या पत्नीकडे चौकशी केली. 'हे विद्रूप कृत्य कुणी केले ?' रागाने ते उद्‌गारले.

तोपर्यंत त्यांच्या पत्नीचे तिकडे लक्षही गेले नव्हते. तिलाही आश्चर्याचा धक्का बसला. घरात लहान मूल नाही. बाहेरून कुणीच आलेले नाही. शिवाय कॅलेंडर साडे सहा फूट उंचीवर असल्यामुळे तेथवर सहजासहजी कुणाचा हात पोहोचण्याचा संभवही नव्हता.

त्यांनी त्या रेघा पुसण्याचा प्रयत्न केला, पण त्या सहजासहजी पुसल्या जाणाऱ्या नव्हत्या. त्यामुळे फोटो विद्रूप झाला असता.

तो दिवस लोटला. रात्री दहाच्या सुमाराला झोपी जाण्यापूर्वी त्यांच्या बंद दारावर कुणीतरी 'टकूटक्' आवाज केला. त्यांनी दार उघडले. बाहेर एक जख्खड म्हातारा त्यांना दिसला. त्याने न बोलता फक्त हात पुढे पसरला. गोपाळरावांनी घरात जाऊन खिशात हात घालून जे नाणे त्यांच्या हाताला लागले, ते त्यांनी त्या वृद्धाच्या हातावर ठेवले. ते चार आण्याचे–पंचवीस पैशाचे–नाणे होते.

भिकारी न बोलता निघून गेला, अन् ते दांपत्य झोपी गेले. सकाळ झाली. नेहमीप्रमाणे सहाच्या सुमाराला उठून त्यांनी पुढील दरवाजा उघडला. पाहातात तो पायरीवर तेच पावलीचे नाणे नि शेजारी विभूत.

गोपाळरावांनी हाक मारून पत्नीला बोलाविले नि म्हटले, ' रात्रीचा तो म्हातारा भिकारी नसून प्रत्यक्ष साईबाबाच असावेत. हे बघ काय ते ! '

' कशावरून ते साई असावेत ? ' पत्नीचा प्रश्न.

' जर तो खरोखरीचा भिकारी असता, तर हे पैसे इथे ठेवून जाता ना ! शिवाय शेजारीही विभूत ! ' असे बोलून आत येऊन भिंतीवरील श्रीसाईंच्या फोटोला नमस्कार करण्यासाठी हात उंचावणार तो त्यांना काय दिसले ? कालच्या त्या रेषा चांगल्याच पुसट झाल्या होत्या.

ती उभयता दिग्मूढ झाली नि आदरपूर्वक बाबांना वंदन करून आपल्या नित्यांच्या कामाकडे वळली.

(२)

वरील प्रकारानंतर एका आठवड्याची गोष्ट. गोपाळरावाकडे एक पाहुणा आला होता. तो एस. टी.ने जावयाचा असल्यामुळे त्याच्यासह ते एस. टी. स्टँडवर गेले. गोपाळरावांची एस. टी. ऑफिसात चांगली ओळख असल्यामुळे पाहुण्याला अडचण पडली नाही. वेळ रात्रीची आठची होती. पाहुणे गाडीत बसले. गोपाळरावांनी त्यांचा निरोप घेतला, नि घरी येण्यासाठी वळले तो त्यांना एक म्हातारा हात पसरून भिक्षा मागताना आढळला. त्यांनी त्याच्या हातावर वीस पैशाचे नाणे ठेवले. म्हातारा निघून गेला नि गोपाळराव घरी आले.

रात्रीची जेवणे झाल्यावर झोपण्यापूर्वी उभयतांनी साईबाबांना नमस्कार केला नि गादीवर अंग लोटून दिले.

सकाळी उठले. मुखमार्जनादि विधि आटोपून चहा घेण्यासाठी टेबलाजवळ बसले. तो एका बशीत भिकाऱ्याला गेल्या रात्री दिलेले ते वीस पैशाचे पिवळे पितळी नाणे दिसले.

आता त्या उभयताना मनोमन खात्री पटली की, हा साई चमत्कारच आहे. दिलेली नाणी न स्वीकारता परत येतात हा बाबांचाच चमत्कार ! दुसरे काय ?

आता त्या जोडप्यांची बाबांवर अधिकाधिक श्रद्धा बसत चालली. त्यानी हार आणून बाबांच्या फोटोला घातला, निरांजन उदबत्ती लावली. अन् दुपारी जेवण्यापूर्वी त्यांना नैवेद्यही दाखवला.

(३)

वरीलप्रमाणे गोपाळरावांना अधूनमधून काहीना काही साक्षात्कार व्हायचे नि बाबा त्यांच्या मनात आपल्यावरील श्रद्धा उत्तरोत्तर वाढवीत जायचे.

पुढे काही दिवसांनी बाबा स्वप्नात येऊन गोपाळरावांना म्हणाले, ' तू माझ्या शिरडीला ये. हात हालवीत येऊ नकोस. मी आहे म्हातारा. मला फार थंडी वाजते. म्हणून येताना एक चादर घेऊन ये ! साधी असली तरी चालेल. मला कुणापासून किंमती माल घ्यायचा नाही अंग झाकले की बस्स् ! '

सकाळी उजाडल्यावर गोपाळरावांनी शिरडीला जाण्याचा बेत आखला. मला पत्राने कळविले, ' मी अमुक एका दिवशी शिरडीला जात आहे आपण येणार असाल तर लोणावळ्याला उतरतो. नाहीपेक्षा आम्ही परभारे जातो. आपल्याकडून उत्तर त्वरित येईल ही अपेक्षा. '

पावसामुळे मला शिरडीला जाता आले नाही. त्यांनी बाबांचे दर्शन घेऊन परतीच्या वेळी लोणावळ्याला उतरून प्रसाद, उदी, अंगठ्या नि गळ्यातील लॉकेटस् मुलांना दिली आम्हाला आनंद झाला. अन् लगेच ठरवून टाकले, आपणही सर्वांनी शिरडीची वारी करायची ! पण संकल्प नि सिद्धी याच्यामध्ये परमेश्वराची इच्छा असताना ! अद्याप तसे काही घडले नाही. जेव्हा घडेल तोच सुदीन म्हणायचा !

(४)

गोपाळरावांची कोकणातील एका खेड्यात बरीच शेतीवाडी, आंबा, फणस, काजू, रातांबी यांची झाडे नि जुने भव्य घर आहे. खेडे सोडून त्याना आठ दहा वर्षे झाली मात्र प्रतिवर्षी गावी दोन तीन फेऱ्या होतात, नि कुळाचा कारभार कसाकाय चाललाय ते पाहून येतात.

असेच एकदा ते गावी जायला निघाले. केव्हा निघायचे तो दिवसही नक्की झाला. त्याच रात्री बाबा स्वप्नात आले, नि म्हणाले तू जातोसच जा बापडा पण जो हेतू धरून तू जात आहेस, तो सफल होणार नाही. शिवाय आता त्या तुझ्या घराकडे तू दुर्लक्ष करावेस हेच चांगले. आजवर तुझे फारच नुकसान झालेय ! आता तर तू हे नवीन मोठे घर बांधले आहेसच ! हेच तुला लाभदायी होईल. गावातील घराने आज मितीस तुझे काहीच कल्याण केले नाही, नि यापुढे होईल असेही नाही तेव्हा उगाच जाण्याचे श्रम तरी कशाला घेतोस ? "

—पण गोपाळरावांनी आपला बेत न बदलता एस टी स्टँडवर गेले नि गाडीत चढायला पाऊल उचलणार तेवढ्यात एक म्हातारा, वारकरी वेशात येऊन त्याना

तिथेच त्याने तांबडे गंध लावलें. गोपाळरावांनी त्याच्या हातावर दहा पैशाचे नाणे ठेवले व गाडी सुरू झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांची पत्नी घरातील केर काढीत असता स्वयंपाक घरात शेगडीसमोर तिला दहा पैशाचे नाणे दिसले. संशय आल्यामुळे तिने ते बाजूला ठेवून दिले. गोपाळराव दोन दिवसांनी घरी परतल्यावर त्या नाण्याचा उलगडा झाला.

गोपाळराव कपाळावरील गंधासह गावी गेले. रोजच ते दाढी करीत असल्यामुळे त्यांच्याजवळ लहान आरसा होता. वारकऱ्याने कसे काय गंध लावलेय हे त्यानी पाहिले पण ते पुसले नाही. गावापासून अलीकडे दोन अडीच मैलावर गाडीतून ते उतरले, नि कधी नाही ते कपाळी गंध पाहून गावकरी थट्टा करतील म्हणून पुसण्यासाठी त्यानी आरसा काढून पाहू लागले. पण होतेच कुठे कपाळाला गंध ? गावच्या वेशीवर येताच ते आपोआप पुसले गेले. ह्या वेळपावेतो त्यानी कपाळाकडे हात नेला नसताही झालेल्या प्रकाराने त्यांच्या डोळ्यासमोर रात्रीचे बाबांचे शब्द उभे राहिले. ' तू जातोसच तर जा ! पण तुझे काम होणार नाही ! '

बाबांनी आपला शिक्का काढून तर घेतला नाही ? गोपाळरावांच्या मनात पाल चुकचुकली. बाबा जाऊ नको म्हणत असताही आपण आलो, म्हणूनच असे झाले. अन ते खरे होते.

(५)

गोपाळराव रिक्त हस्ताने गावाहून परत शहरी घरात आले. त्याना कुळांना भेटून काही येण्यादेण्याचा व्यवहार करायचा होता, पण तो काहीच झाला नाही. त्याच दिवशी सकाळी ती दोन्ही कुळे बाहेरगावी कामानिमित्त निघून गेल्याचे समजले. गोपाळरावांच्या मते आपल्या येण्याचा सुगावा लागल्यामुळे ती दूर गेली. कसेही असो. त्यांचे काम काहीच झाले नाही.

आता गोपाळरावापुढे एक मोठा प्रश्न होता. त्याना एक महत्वाचा जोखमाचा व्यवहार करायचा होता. त्या काळजीत गेले चार महिने ते होते.

एक दिवस रात्री बाबा स्वप्नात येऊन म्हणाले, ' हा जो तू व्यवहार करणार आहेस, तो सफल होईल—अन् अलीकडे जो माणूस तुझ्याकडे फेऱ्या घालीत आहे, त्याच्याशीच तो होईल. या बाबतीत तू जास्त ओढाताण करू नकोस! लोभाने नाकारशील तर पश्चात्ताप पावशील ! '

अन् काय चमत्कार, आठवड्याच्या आतच मागाहून आलेल्या माणसाबरोबर व्यवहार करणे गोपाळरावांना सोयीचे वाटले नि त्याने त्याच्या मनाप्रमाणे सारे काही कबूल करून तो व्यवहार पूर्ण केला.

आता गोपाळराव पति-पत्नीची बाबांवर नितांत श्रद्धा बसली. कॅलेंडरमधील बाबांची मूर्ति काचेच्या फ्रेममध्ये बसवून तिची रोज पूजाअर्चा होऊ लागली. अन् भावी आयुष्यात आणखी काय नवे घडते, याकडे त्यांची दृष्टि लागली. आता उठल्या बसल्या बाबांचे नाव जिभेवर घोळू लागले, नि रोजच्या कामाकडे लक्ष देण्यास उत्साह उत्पन्न झाला.

हे सारे मी गोपाळरावांच्या तोंडून ऐकले. अन् ह्या गृहस्थाचे एवढे परिवर्तन त्यांनी केले, ती बाबांची मूर्ति आमच्याही डोळ्यापुढे नाचू खेळू लागली. आम्ही मनात म्हटले, ' बाबा, गाड्याबरोबर नळ्याची यात्रा होते ना, तशी गोपाळरावांपायी आम्हालाही साक्षात्कार दाखवून आपले दास करा ! '

## ( ६ )

गोपाळराव पति-पत्नी परम साईभक्त झाली. त्यांच्या शिरडीला दोन वाऱ्या झाल्या. मोठ्या मजेत नि आनंदात नवे ऐशी साल त्यांना साईकृपेने फलदायी झाले. मात्र असे जरी घडले तरी गोपाळराव स्थितप्रज्ञाप्रमाणे असतात. मुळातच ते मितभाषी. डामडौल त्यांच्या स्वभावातच नाही. विद्वत्ता असूनही तिचे प्रदर्शन त्यानी लोकांपुढे मांडलेले मी तरी कधी पाहिले किंवा ऐकलेही नाही.

तुम्ही त्याना बाबांबद्दल काही विचारा—त्यांचे आपले एकच उत्तर. ' मी काही तसा त्यांचा मोठा भक्त नाही. त्यानी दृष्टांत दाखविला, मला तो पटला. अन् मी त्याप्रमाणे वागलो. मात्र तसे करताना कधी कंटाळा केला नाही, की हुरळून गेलो नाही. कधी आनंदाला पूर आला नाही की, खडखडाट नाही आपले साधे झुळझुळ वाहाणारे पाटाचे पाणी. जीवनात कुणाची खंबीर सोबत नव्हती, ती मिळाली. आधार झाला. '

' आता कधी शिरडीची वारी करणार ? आम्हालाही प्रसादाचा वाटेकरी करा !' मी म्हटले त्याना.

त्यावर ते म्हणाले, ' प्रसाद ज्याने त्याने स्वतःच्या भक्तिभावावर मिळवायचा असतो. यश मागून मिळत नसते. ते मिळवावे लागते. मात्र त्यासाठी लागणारे श्रम, कष्ट, सेवा, भक्ति नि मनाची तयारी ज्याची त्यानेच करायची असते. '

गोपाळराव गोड माणूस. बाबांनी त्यांचे सोने केले. पुष्कळांना श्रीसाईबाबांनी धन्य केले, भाग्यवान बनविले. मोठे केले. हवे हवे ते दिले. असे ऐकत आलो, वाचीत आलो आणि त्याचे प्रत्यंतर गोपाळरावांना बाबांनी दाखविलेल्या चमत्कारा-वरून प्रत्यक्ष पाहायला मिळाले.

श्री साई, तुम्ही असेच आम्हालाही पोटाशी धरा नि सद्गतीचा मार्ग दाखवा. यापरते माझ्यासारख्याचे दुसरे कोणते मागणे असणार?

असेच आणखी काही चमत्कार श्रीबाबांनी गोपाळरावांना दाखविले. कोणत्याही वेळी कुणाला भिक्षा म्हणून पैसा द्या, तो साईबाबांच्या हाती पडून पुन्हा घरी यायचा असे प्रत्येक वेळी घडायचे.

माझे एक स्नेही महिन्यापूर्वी लोणावळयाहून आपल्या सासुरवाडीस गेले होते. त्यानी गोपाळरावांना बाबांचा होत असलेला साक्षात्कार माझ्या तोंडून ऐकला होता म्हणून ते सपत्नीक गोपाळरावांच्या शहरी घरी भेटण्यास अन् आमच्याकडील कुशल सांगण्यास गेले होते. कंपाऊंडचा दिंडीदरवाजा उघडून आत अंगणात पाऊल टाकतात तो त्याना पंचवीस पैशाचे पांढरे शुभ्र चकाकणारे नाणे दिसले. ती वेळ सकाळची साडेनऊची होती. त्या गृहस्थानी ते नाणे उचलून आत नेले नि म्हणाले, 'गोपाळ-राव, ही पावली पाहा. तुमच्या अंगणात पडली होती. धांदलीने भाजी आणायला जाता येता पडली असावी.'

पावली पाहून गोपाळराव चकीत झाले, नि उजाडता सहा वाजता आलेल्या भिकाऱ्यास आपण ती दिल्याचे त्यांनी सांगितले.

इकडून गेलेल्या माझ्या स्नेह्याना गोपाळरावाना बाबा वारंवार चमत्कार दाखवितात नि त्यांची सोबत करतात हे प्रत्यक्ष पाहून नि ऐकून धन्यता वाटली.

बाबा प्रसन्न झाले की असे होते. नि मग प्रसन्नतेने दिले जाणारे वरदान दो करांनी किती नि कसे घ्यावे असे इतरांप्रमाणे गोपाळरावांना होऊन जाते. अशी वारंवार होणारी जागरूक गोपाळरावाना लाभली हे खरोखरीच त्यांचे सद्भाग्य नव्हे का?

हीच जीवनाला उत्तेजीत करणारी नि नवजीवन देणारी 'श्री साई-सुधा.'

# सा विद्या या विमुक्तये

## श्री गुरूमाहात्म्य

डॉ. अनिल जायस्वाल,
श्री साई क्लिनिक चितारओळ,
नागपूर-२.

नाहीं ठावा सद्गुरूमहिमा। कुबुद्धि आणि कुतर्क प्रतिमा ॥
सदा निज शहाणीवेचा गरिमा। वादकर्मी प्रवृत्त ॥

तेथें माझी काय मात। वादावादी किमर्थ ॥
गुरूविण ज्ञान वा परमार्थ। नाहीं हा शास्त्रार्थ दृढ केला ॥ १९१ ॥

— ( श्री साईसच्चरित अध्याय २ )

● वाचकांनो ! थोर साईभक्त कै. गोविंद रघुनाथ उर्फ आण्णासाहेब दाभोलकर यांनी वरील ओळी श्री साईसच्चरितात उद्घोषित केलेल्या आहेत. त्यांना श्री साई समर्थांनी 'हेमाडपंत' या संबोधनाद्वारे विभूषिले होते. तद्नंतर ते बहुधा याच नावाने ओळखले जातात. प्रथमतः 'हेमाडपंतांना' गुरूभक्ती किंवा गुरूप्रेम मुळीच नव्हते. तसेच गुरु करणे हे थोतांड आहे असे त्यांना वाटत असून गुरू करण्याची आवश्यकताच नाही असे ते प्रतिपादन करीत. शिवाय स्वकर्तृत्वाचाच अभिमान ते अधिक बाळगित असत. परंतु श्री बाबांची नजरानजर होऊन काही मनोमय साक्षित्व शब्दोच्चार झाल्याबरोबर ते सर्वस्वी अभिमानगळीत झाले व सद्गुरू वाचून तरणोपाय नाही अशी त्यांना पूर्ण खात्री पटली. नंतर त्यांचेवर बाबांची कृपाहि झाली. त्यांच्याच आशेस्तव व कृपाशिर्वादाची साथ मिळाल्यामुळे त्यांनी 'श्री साई-सच्चरित' हा गुरूचरित्र विस्तृत ओवीप्रबंधातच लिहिलेला असून आजतागायत वर्षानुवर्षे संस्थानद्वारे प्रकाशित ग्रंथ असंख्य साईभक्तांना निरनिराळ्या भाषेत उपलब्ध आहे. हे सर्व त्याच ग्रंथाच्या प्रस्तावनेत नमूद केले गेले आहे.

अहो ! सद्गुरूची सेवा तर स्वत: ईश्वरासही करावी लागली. गुरूसेवेचा आदर्श स्थापित करण्यासाठीच की काय – स्वतः भगवंत श्रीकृष्ण क्षीप्रा नदीच्या काठी वसलेल्या उज्जैन क्षेत्रातील सांदिपनि नामक ऋषींच्या आश्रमात विद्या प्राप्त करण्यास गेले.

सुपात्र सद्‌गुरूंची सेवा केल्याशिवाय ईश्वरकृपा प्राप्त करणे—अशक्यच म्हणायचे. तन, मन, धन—हे सर्व सद्‌गुरूंना अर्पित केल्यास आपणास त्यांच्या अंतरंगात वसलेला आशिर्वाद प्राप्त होत असतो. मानवासाठी अशा प्रकारची संतसेवा अत्यावश्यक आहे. तेव्हाच आत्मोन्नति होणे शक्य आहे. याद्वारेच मानव खऱ्या अर्थाने ' मानव ' बनू शकतो.

सेवेद्वारे प्राप्त केलेली विद्याच सफलतेचे साधन आहे.
त्यातच जीवन-साफल्याचे मर्म दडपलेले आहे.

पुस्तक वाचून प्राप्त केलेल्या ज्ञानाद्वारे आपण केवळ ' धन व प्रतिष्ठा 'च प्राप्त करू शकतो. परंतु मानसिक शांति फक्त पुस्तकीय ज्ञानाद्वारे मिळूच शकत नाही.

सद्‌गुरू तर केवळ आपल्या दृष्टीसामर्थ्याद्वारे सुद्धा सुपात्र भक्तांना उपदेश करू शकतात. वाणी वा शब्दांची त्यांना मुळीच आवश्यकता भासत नाही. दृष्टादृष्ट होताच सुपात्र भक्तांस योग्य तो उपदेश मिळाल्याची जाणीव होते. सद्‌गुरूंचा प्रत्येक व्यवहार ज्ञान व भक्तीने परिपूर्ण असतो. केवळ स्वप्रयत्नाने प्राप्त केलेली विद्या आपणात अहंभाव व स्वाभिमान उत्पन्न करू शकते. परंतु सद्‌गुरूंच्या कृपाशिर्वादाद्वारे प्राप्त झालेली विद्या आपणात विनय व विवेक आणते. बुद्धिमान असूनही मग आपण सर्वांसमोर विनम्रतेने वागतो.

सर्वशक्तीमान प्रभु श्रीकृष्ण सुद्धा आपल्या गुरूसाठी अरण्यातील लाकडे आणायचे व पाणीसुद्धा भरायचे.

पूर्वीचे गुरू पूर्णतः विरक्त असायचे. त्यांची आसक्ती काय तर ईश्वरचरणीच असायची. परिणामस्वरूप त्यांचे शिष्यसुद्धा तसेच निघायचे. वैराग्यशिवाय विद्या सुशोभित होत नसते. विद्योपार्जन करणारा विद्यार्थी जर विलासी व कामुक प्रवृत्तिचा असेल तर त्याच्या विद्येचा त्वरित ऱ्हास होत असतो. श्रीकृष्ण प्रभुंचे विद्यार्थी—जीवन फार संयमी होते.

सद्‌गुरूंचे संस्कार, चांगले—वाईट विचार इत्यादी सर्वकाही विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रतिबिम्बस्वरूप उतरत असतात.

परंतु या कलीयुगात कित्येक महाविद्यालयीन व विश्वविद्यालयीन गुरू तर आपणास विलासी असल्याचे आढळतात. परिणामस्वरूप बहुसंख्य विद्यार्थी वर्ग विलासी दिसणे स्वाभाविकच आहे.

विलासी शिक्षकांद्वारे शांकरभाष्य शिकविणे निरर्थकच म्हणायचे.

सद्‌गुरूंचा संयमीपणाच त्यांच्या निस्वार्थी भक्तात आढळतो. संयमावस्था परम सुखदायी आहे. विद्यार्थी दशेत तर संयमी असणे अत्यावश्यक आहे.

वर्तमानकाळी तर पैसे कमविण्याची विद्या शिकविली जाते. सांसारीक बंधनातून मुक्त होण्याचे शिक्षण मुळीच देण्यात येत नाही. आत्मविद्या व अध्यात्मविद्येचे तर अलीकडील शिक्षण पद्धतीतून नामोनिशान मिटलेले दिसते. आत्मा, परमात्मा व या दोहोंचा पारस्परिक संबंध काय ? जीवनाचं खरं लक्ष काय ? आणि त्याकडे अग्रेसर होण्याची रीत — इत्यादी काहीसुद्धा आपणास मुळीच समजविल्या व शिकविल्या जात नाही. ज्ञान तर दिवसे दिवस वाढतच चाललेले आहे. परंतु विद्या तर क्षणोक्षणी ऱ्हास होण्याच्या मार्गास लागलेली आहे. ज्ञानाचा उपयोग छल-कपटसाठीच करण्यात येत आहे.

“सा विद्या या विमुक्त ये!”

अर्थात खऱ्या अर्थाने विद्या तिच की जी प्रभुचरणांकडे घेऊन जाते व मुक्ती सुलभतेने मिळवून देते.

गुरूंच्या आश्रमात शिक्षणास्तव असलेल्या एका गरीब ब्राह्मण पुत्राशी परमेश्वर श्रीकृष्णाची मैत्री जडली. तो सौराष्ट्राचा असून त्याचे नाव ‘सुदामा’ होते. श्रीकृष्णाच्या आणखी इतर कोणत्याही मित्राचा ‘श्रीमद्भागवत’ मध्ये उल्लेख केला गेलेला नाही. यास कारण कोणते ? असा प्रश्न वाचकांच्या मनात उद्‌भवणे स्वाभाविकच आहे.

आजकाल तर अगदी उलट स्थिती उत्पन्न झालेली आहे. गर्भ-श्रीमंत, धनिक व्यक्तींशीच कोणी कोणाचा मित्र बनविण्याची अभिलाषा बाळगतो. ज्याच्या जवळ लॅम्ब्रेटा, मोटार आहे, जो सिनेमा व उपहारगृहांचा छंद पुरवू शकतो, ज्याने हिप्पी टाईप केस वाढविले आहे, आणि जो नाना प्रकारच्या विषय-वासनेत गुंग असतो— अधिकांशतः अशाच लोकांना आपण मित्र बनविण्याची अपेक्षा बहुधा बाळगित असतो. याद्वारे अनेकानेक व्यसने आपणास सहजतेने होत असतात व ते आपणास जडतात. मग आपण मुक्ती व भक्ती सोडून ‘भुक्ती’च्या अर्थात सुरा व सुंदरीच्या मागेच पळत सुटतो.

परंतु भगवान श्रीकृष्णांनी मैत्री जोडली तर ती कोणाशी ? ज्याला धड घालायला, पांघरायला नाही-खायला नाही अशा त्या दीन गरिबाशी. सुदामा त्यांचा मित्र बनला.

इन्द्रियाचे दमन व निग्रह करणारा—म्हणजे 'सु-दामा' इन्द्रियनिग्रहाशिवाय विद्या मिळत नाही व फळासही येत नाही.

हा त्याचा आदर्श आपणासमोर ठेवण्यासाठीच की काय—सुदामाशिवाय इतर कोणत्याही मित्राचा उल्लेख आपणास 'श्रीमद्-भागवत' ग्रंथात सापडत असेल.

सुदाम्याशी मैत्री जोडणाराच
सरस्वतीची उपासना करू शकतो.
सुदामा—त्या संयमी व्यक्तीचे प्रतिक आहेत,
जे परमेश्वरास प्राप्त करू इच्छितात.

परमेश्वराच्या दर्शनासाठी संयमाशिवाय विद्या प्राप्त होऊ शकत नाही. संयमाशिवाय जीवन दिव्य होत नाही. संयम व वैराग्य वाढवित चला. ज्या सुखाचा आपण सर्वस्वी त्याग केलेला आहे त्यास उपभोगण्याची इच्छा कधीही बाळगू नका. त्यागिलेल्या विषयांची इच्छा मानवाने पुन्हा कधीही करू नये. त्यागातच संयम व वैराग्य समावलेले आहे. शास्त्र हे ईश्वर, जीव आणि पशु-पक्ष्यांसाठी नसून ते केवळ मानवासाठी आहे.

सुदाम्याशी मैत्री जोडाल
तर द्वारिकानाथ वा
द्वारकामाईतील साईनाथ
अवश्य, अवश्य येऊन भेटतील.

सुदामा सर्वोत्तम स्वरूपाचे साक्षात स्वरूप आहेत.
मनावर पूर्ण ताबा ठेवा. मन काबूत असू द्या.

श्रीकृष्णांनी सांदिपनी नामक गुरूंची सेवा केली.
जे आत्मतत्वाचें संदीपन करवू शकतात तेच सांदिपनि.
जे साक्षात ईश्वर तेच श्री साई.
जे या कलीयुगात अवतरले तेच साई.
जे द्वारकामाईत राहिले तेच श्री साईनाथ.
जी आपण सर्वांची माऊली—तीच साई माऊली.

व

'आपण सर्वांचा मालक'—तोच साई—असे फारसी भाषेत 'साई' या शब्दाचे विश्लेषण केले गेलेले आहे.

सद्गुरू श्री साईनाथ हे आपणास बाहेरून काहीच आणून देत नाहीत. आपल्यात जे काही सुप्तावस्थेत आहे तेच ते जागृत करीत असतात. अशी क्रिया सुपात्रास निस्वार्थ व निष्कामपणे करवून देणाऱ्या महान विभूतीसच आपण 'सद्गुरू' म्हणतो. मग ते कान फुंको वा न फुंको. दीक्षा देवो अथवा न देवो. लौकीकदृष्ट्या या समस्त जागतिक व्यवहारापासून अलिप्त राहून सांसारीक मानवोन्नतिसाठी जो सतत निरपेक्ष बुद्धीभावाने झटत असतो—तोच 'सद्गुरू' आहे.

आपणसुद्धा अशा सद्गुरूंच्या चरणाश्रयात निष्काम व निस्वार्थतेने गेल्यास दोन पैसे गुरूदक्षिणा रूपाने देण्यास सहर्ष तत्पर असावयास पाहिजे. एक म्हणजे दृढनिष्ठा व दुसरा म्हणजे सबुरी. परंतु आपण तर अशा प्रकारची गुरूदक्षिणा देण्यात कृपणता दर्शवितो, शिवाय त्यांच्याकडे सकाम व स्वार्थीबुद्धीनेच जातो. मग आपल्याकडे त्यांनी का न्याहाळावे ? न्याहाळले तरी त्यांच्या मूक-वाणीचा आपणास कसा काय बोध होणार ? या प्रश्नांवर सर्वांचे ध्यान आकृष्ट व्हावयास हवे. परंतु आपण बहुधा टाळाटाळ व दिरंगाई करतो व नेमके इथेच आपण चुकतो.

ज्ञानमार्गी अवलंबियांना जे काही प्राप्त होण्यासारखे आहे—तेच प्राप्त होत असते. परंतु भक्तीद्वारे तर अप्राप्यही सहजतेने प्राप्त होऊ शकते.

श्रीकृष्णाने संयमरूपी सुदाम्याशी मैत्री जोडून सदाचारपूर्ण जीवन व्यतित केले. सर्वशक्तीमान प्रभुस देखील या भूतलावर गुरूची आवश्यकता आहे. 'श्री गुरू माहात्म्य' पटवून देण्यासाठीच निंबवृक्षाखालील पवित्र भूमीस "हे माझ्या गुरूचे स्थान आहे"—असे स्वतः श्री साईसमर्थांनी सूचित केले होते. लाखो जनसमुदाय शिर्डीस आल्याबरोबर प्रथमतः या "श्री साईंच्या गुरूरायांच्या स्थानास' आजतागायत पूजतो. मनोभावाने ओवाळीतो. त्यांना प्रथम स्थान देतो.

संसारात राहून ब्रह्मचर्याचे पालन करणे फारच कठिण आहे. परंतु गुरूकृपा लाभल्यावर कठीणही सुलभ व अशक्यही शक्य होत असते.

सात्विक वातावरण लुभवितो तर
दूषित वातावरण भुलवितो.
सात्विक वातावरण हृदयास सुधरवितो तर
दूषित वातावरण हृदयास बिघडवितो.

स्वतः ईश्वर असूनही कन्हैय्याने गुरूसेवा करून आपण सर्वांसमोर एक आदर्श स्थापित केला.

गोपींनी श्रीकृष्णास काहीसुद्धा मागितले नाही, कशाचीही याचना केली नाही. म्हणूनच श्रीकृष्ण त्यांचे सदैव ऋणी राहीलेत. घरातील कोणतेही काम करताना

गोपींच्या ध्यानीं–मनीं श्रीकृष्णच असायचे. सासू–सासऱ्यांची, पति, दीर, नणंदेची व पशुपक्ष्यांचीही सेवा करताना “ आपण जणू काही श्रीकृष्णाचीच सेवा करीत आहो ” —असाच त्यांना भास व्हावयाचा. गोकुळातल्या गोपींनी कधी तप केले नाही की जप केले नाही. तरीपण त्यांना श्रीकृष्ण सदैव त्यांच्या डोळ्यासमोरच दिसायचे. श्रीकृष्ण मथुरानगरीत गेल्यावरही गोकुळातच त्यांना श्रीकृष्ण दिसायचे. म्हणूनच रासलीलेतील सर्व गोपी कृष्णमयी झाल्या. स्त्रीत्वाचे भान हरपले व शेवटी नारदाचाही नारदी झाला. साईलीलाच रासलीला आहे.

निष्काम सेवाच सफलतेचे साधन आहे.
निस्वार्थ भक्तीच फलीभूत होत असते.
सद्‌गुरूंना प्राप्त करण्याची व त्यांचा कृपाशिर्वाद मिळविण्याची—
हिच गुरूकिल्ली आहे.

याक्षणींच आपणही सर्वव्यापी श्री साईनाथ प्रभूंशी भविष्यात काही–एक न मागण्याचा दृढनिश्चय करू या.

जय जय जय श्री साँई गुंसाँई !
कृपा करो गुरूदेव की नाँई !!


# संत चूडामणि भगवान श्रीसाईबाबा

: लेखक :

● सदानंद चेंदवणकर, कार्यकारी संपादक श्रीसाईलीला,
श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

● श्रीसाईबाबांच्या जीवन कार्याचा आणि त्यांच्या चमत्कारांचा संपूर्ण परिचय करून देणारा सचित्र व भक्तांना संग्राह्य असा नाविन्यपूर्ण ग्रंथ.

● संतशिरोमणी दासगणूमहाराजांचे मानसपुत्र ह. भ. प. श्री. अनंतराव आठवले यांचे शुभ हस्ते येत्या रामनवमीस शिर्डीस प्रकाशित होणार.

शुभाषित – श्री. क. हि. काकरे, कोर्टरिसिव्हर
श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी

# श्रद्धा आणि सबूरी

—श्री. ज. ना. कुलकर्णी,
७१ स्वाति सोसायटी श्रीसाई सदन,
पद्मावती पुणे ४११ ००९.

● शुष्क काष्ठाचा क्षणात वृक्ष झाला सद्‌गुरु श्री साईबाबांनी आपल्याकडे येणाऱ्या सर्व भक्ताना श्रद्धा आणि सबूरी हा अमोल मंत्र दिला. हा मंत्र देताना त्यांनी सांगितलं माझ्या गुरुनी माझ्याकडे गुरुदक्षिणा म्हणून दोन पैसे मागितले व ते मी तात्काळ देऊन टाकले. ते दोन पैसे म्हणजेच श्रद्धा आणि सबूरी.

श्रीबाबांना श्रीदत्त अवतार मानतात. श्रीबाबांच्या अवतारापूर्वी जे जे श्रीदत्त अवतार झाले त्या सर्व अवतारात श्रद्धा व सबूरी हा मंत्र होता पण श्रीबाबांनी आपल्या अवतारात त्याला सर्व हृदयस्पर्शी करून विशालता प्राप्त करून दिली.

श्रीदत्त अवतारात सर्व जन मानसाच्या हृदय मंदिरात अगदी भरून राहिलेला अवतार म्हणजे श्रीनरसिंह सरस्वती स्वामी. त्यांचे विस्तृत जीवन व लीला श्रीगुरुचरित्र या पोथीत नामधारक याने फारच रसाळ व बहारीने सांगितल्या आहेत. श्रद्धा व सबूरी यांचे दर्शन घडवणाऱ्या अनेक कथा त्यामध्ये आहेत, त्यातली ही एक कथा पहा म्हणजे श्रद्धा व सबूरी हा मंत्र त्या अवतारात सुद्धा होता हे कळून येईल.

स्वामीनी अनेक तीर्थ क्षेत्रे प्रकाशात आणली व शेवटी गाणगापूर येथे येऊन राहिले. गाणगापूर हे श्री दत्तपीठाचे फार मोठे स्थान आहे.

स्वामी गाणगापूरला असताना त्यांचा दिन–क्रम म्हणजे ते पहाटे गाणगापूरा' न चार मैल अंतरावर असलेल्या भीमा अमरजा नदी संगम आहे त्या ठिकाणी नुष्ठानास जात असत. माध्यान्य काळी अनुष्ठान संपवून पुन्हा गाणगापूरला येत.

एके दिवशी सकाळी नरहरी नावाचा सर्वांग कुष्ठाने भरलेला विप्र त्यांचेकडे आला. श्री गुरूना दोन्ही हात जोडून त्याने नमन केले, स्तुति केली.

तुमची किर्ती ऐकून मी दर्शनाला आलो आहे. आपण परम दयाळू भक्त वत्सल आहात. हा माझा जन्म एखादया दगडा प्रमाणे आहे. कुष्ठी म्हणून लोक

माझी कुचेष्टा करतात. मला कुणी भोजनाला सांगत नाही. अितकंच काय पण सकाळी उठल्यावर लोक माझे तोंड पहायचे टाळतात. यामुळे जीवाला फार यातना होतात. मला आता हा जन्म पुरे झाला. जन्म जन्मांतरी असंख्य पापे केली त्याचा भोग मी भोगतो आहे. आता मला हे सहन होत नाही. असंख्य तीर्थक्षेत्री जाऊन आलो. सगळ्या देवांची उपासना, आराधना केली, नाना प्रकारची व्रते केली पण माझी व्याधी नष्ट होत नाही.

मी आता मनाचा पक्का निर्धार केला आहे आपली कृपा झाली नाही, तर मी प्राणत्याग करणार अशी विनवणी करून गुरूंची स्तुति केली, व पुन्हा पुन्हा चरणावर लोटांगण घातले.

त्याचे अत्यंत करूण शब्द ऐकून भक्त वत्सल स्वामी म्हणाले. पूर्व जन्मी महा पातके केलीस म्हणून या जन्मी तू कुष्ठी झालास. आता मी सांगतो ते कर म्हणजे तुझी पापे नष्ट होतील, व तुला उत्तम शरीर लाभेल.

इतक्यात एक गृहस्थ औदुंबराचे एक सर्पणासाठी वाळलेले लाकूड सर्पणासाठी नेत असलेला त्यांनी पाहिला. स्वामींनी ते लाकूड घेतलं व त्या कुष्ठी विप्राला म्हणाले, हे लाकूड घे, संगमावर जा. पूर्व दिशेला भीमातीरी हे लाकूड रोव. संगमात स्नान करून अश्वत्थाची पूजा कर व या रोवलेल्या काष्ठाला सकाळ, दुपार, संध्याकाळ दोन घागरी पाणी घाल.

ज्या दिवशी या काष्ठाला कोवळी पालवी फुटेल त्या दिवशी तुझी पापे नाहीशी होतील, व तू उत्तमांगी होशील.

विप्राच्या मनात स्वामींच्या शब्दावर नितांत श्रद्धा निर्माण झाली. धावत जाऊन त्याने ते काष्ठ उचलून डोक्यावर घेतलं व भीमातीरी जाऊन संगमावर रोवलं. ज्या प्रमाणे स्वामींनी सांगितलं होतं त्याप्रमाणं अत्यंत श्रद्धेनं त्याने आचरण सुरू केले.

या प्रमाणे रोज उपवास करून त्या काष्ठाला वेळोवेळी तो पाणी घालत होता. असे सात आठ दिवस झाले. रोज त्या काष्ठाला पाणी घालताना पाहून तिथले लोक त्याला म्हणाले अरे हे तू काय करतोस ! हे शुष्क काष्ठ कशाला रोवलस ! ह्याचे संजीवन होणे कधी शक्य आहे का ? स्वामी कृपाळू आहेत, भक्तावर त्यांचा वरदहस्त आहे, सगळ्यावर ते कृपा करतात. तुझी पापे नष्ट होणार नसतील म्हणून तुला या शुष्क काष्ठाला पाणी घालण्यास सांगितले असेल. सोडून दे हे. का निष्कारण कष्ट करतोस !

हे ऐकून विप्र नमस्कार करून म्हणाला गुरुंचे वाक्य म्हणजे कामधेनू आहे. ते कधीही खोटे होणार नाही. माझी श्रद्धा आहे गुरु वाक्य सत्य होईल व या काष्ठाचा वृक्ष होईल, व त्याकरता माझे प्राण गेले तरी हरकत नाही मी गुरुंनी सांगितल्या- प्रमाणें करणारच. असं सांगून विप्र त्या काष्ठाची सेवा करत राहिला.

एके दिवशी स्वामींच्या भक्तांनी स्वामींना सांगितलं एक विप्र संगमावर एक शुष्क काष्ठ रोवून त्याला सजीवता आणण्यासाठी श्रद्धेनं निर्धारानं सेवा करीत आहे आम्ही त्याला किती समजावून सांगितले की मूर्खासारखे का विनाकारण कष्ट करतोस, तर तो म्हणतो गुरूंच्या वचनाप्रमाणं मी करीत आहे. गुरू आपले वचन खरे करतीलच.

हे ऐकून स्वामी म्हणाले ज्याच्या मनात जसा भाव असेल त्या प्रमाणे त्याला फळ मिळेल. गुरूच्या वचनावर भक्ती पूर्वक श्रद्धेत विश्वास ठेवल्यास त्याला इच्छित फळ प्राप्त होईल. एवढे सांगून त्यांना गुरू वचनाच्या निष्ठेची एक कथा सांगितली.

दुसरे दिवशी नित्या प्रमाणे स्वामी अनुष्ठान संपवून त्या विप्राकडे गेले तर तो मोठ्या श्रद्धेने त्या काष्ठाची सेवा करताना दिसला.

त्याचे श्रद्धेने भरलेले अंतःकरण बघुन स्वामी प्रसन्न झाले. हातात गंगा जळाने भरलेला कमंडलू होता, त्यातले जळ त्या शुष्क काष्ठाला गुरूंनी घातले आणि काय आश्चर्य त्या शुष्क काष्ठाला पाने फुट्टन आली व क्षणात ते काष्ठ औदुंबराच्या वृक्षा प्रमाणे झाले.

चिंतामणीचा स्पर्श होताच लोखंडाचे सुवर्ण होते त्या प्रमाणे गुरू हस्त जळ लागताच काष्ठ वृक्ष झाला. इकडे त्या विप्राचे कुष्ठ जाऊन तो उत्तमांगी झाला. विप्राने स्वामींच्या चरणी लोटांगण घातले, त्यांची स्तुती केली. अशा प्रकारे पूर्वीच्या श्री दत्तावतारात सुद्धा ' श्रद्धा व सबूरी हा मंत्र होताच. सद्गुरु श्रीसाईबाबांनी तो मंत्र असंख्य जनांच्या हृदया पर्यंत पोचवला व त्याला विशालता प्राप्त करून दिली.

अशाच प्रकारे आपण श्रद्धा व सबूरी हा मंत्र हृदयात ठेवून श्रीसाईबाबांची सेवा करावी व इच्छित प्राप्त करून घ्यावे.

॥ जय सद्गुरु श्रीसाईनाथ ॥

# 'साईधाम' मधे नूतन साईमूर्तीची प्राणप्रतिष्ठा



साईधाममधील नवी मूर्ती

गिरगावातील वल्लभभाई पटेल मार्गावरील साईधाम वाडीतील प्रसिद्ध साईबाबा मंदिरात रवि. ता. २१–१२–८० रोजी दत्तजयंतीच्या सुमुहूर्तावर दुपारी ठीक दिड वाजता साईबाबांच्या संगमरवरी मूर्तीची समारंभपूर्वक प्राणप्रतिष्ठा करण्याचा विधीव्रत सोहळा दहा वेदशास्त्र संपन्न पुरोहित पंडितांच्या मंत्र जयघोषात पार पडला. हजारो साईभक्त या प्रसंगी हजर होते.

हा सोहळा शनि. ता. २० डिसेंबर पासूनच सुरू झाला व समारोप गुरु. ता. २५ रोजी चौपाटीवरील बिर्ला क्रिडाकेंद्रात झाला. या प्रसंगी मुंबई वरीष्ठ न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती व श्री सिद्धीविनायक मंदिराचे मुख्य विश्वस्त श्री. मनमोहन दशरथ कांबळीसाहेब अध्यक्ष या नात्याने उपस्थित होते. साईधामने आजवर केलेल्या व करीत असलेल्या अनेक लोकोपयोगी कार्यांची त्यांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली आणि संस्थेत होणाऱ्या भाषण, कीर्तन, प्रवचन यामधून चालू परिस्थितीचा कायापालट आणि जनतेत माजलेल्या बेदिली बेशिस्तीपणाचे निराकरण कसे करता येईल यावर भर देणारे कार्यक्रम विशेषत्वाने आयोजित करावेत असे प्रेमळपणे सुचविले. सोहळ्यानिमित्त संस्थेने प्रकाशित केलेल्या सुंदर स्मरणिकेचेही प्रकाशन अध्यक्षांचे हस्ते करण्यात आले. शेवटी संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष श्री. रघुवीर कामत व विश्वस्त अध्यक्ष श्री. भाईसाहेब मालपेकर यांचेकडून अध्यक्षांचा शाल-श्रीफल-पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. सौ. कांबळी या पण समारंभास हजर होत्या.

शेवटी सौ. प्रमिला दातार आणि त्यांच्या वाद्यवृंदाचा बहारदार कार्यक्रम होऊन रात्री ९-१५ वा. कार्यक्रम संपला. बाहेर कडक थंडी पडली होती तरीही रसिक भक्तांची सभागृहात शेवटपर्यंत झालेली तोबा गर्दी कायम होती. दिनांक २१ व २५ या व्यतिरिक्त उत्सवात महिलांची भजने, श्रीमती पाटील यांची भक्तीगीते सौ. कमलाबाई शेट्ये यांचे ज्ञानेश्वरी प्रवचन, सूर्यकांतबुवा पाठक, बुवा वामन खोपकर, बुवा विलास पाटील इ. चे भजनाचे श्रवणीय कार्यक्रम झाले. शिर्डीचे साईबाबा हा हिंदी चित्रपटही साईधाम मंदिरात दाखविण्यात आला.

साईधामच्या सर्व विश्वस्त व कार्यकारी मंडळाने तसेच सेवेकरी कार्यकर्त्यांनी संपूर्ण सोहळयास हातभार लावून कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यास यथासांग मदत केली याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करावेसे वाटते.



स्वर्गीय महामना प. पू. श्री राधाकृष्ण स्वामीजी

# प. पू. राधाकृष्ण स्वामी यांचा प्रथम स्मृतीदिन

● अखिल मानव जातीवर निर्व्याज अलोट प्रेम करणारे त्यागी, निस्वार्थी वृत्तीचे थोर संत, अखिल भारतीय साईं समाज मद्रास या ज्येष्ठ व श्रेष्ठ संस्थेचे अध्यक्ष, प. पू. राधाकृष्ण स्वामी उर्फ श्रीसाई पादानंद यांची प्रथम पुण्यतिथी बंगलोर येथे श्री साईं स्पिरिच्युअल सेंटर, साईबाबा मंदिर रोड, त्यागराज नगर येथे येत्या ३०–३१ जानेवारी व १ फेब्रुवारी या तिन्ही दिवशी त्यांच्या असंख्य भक्तगणांतर्फे साजरी होत आहे. याच सोहळयात स्वामीजींच्या संगमरवरी पूर्णाकृती पुतळयाचे अनावरण पण तिथे होत आहे.

श्रीराधाकृष्ण स्वामीजींची श्री साईबाबांवर गाढ श्रद्धा व भक्ती होती. त्यांचे जपजाप्य, नामस्मरण, साईभक्तीचा प्रचार-प्रसार व यातूनच जनकल्याण आणि परोपकार यामध्येच त्यांनी आपले सारे जीवन व्यतीत केले होते. एक उच्च दर्जाचे ऋषीतुल्य संत म्हणून सारा भारत त्यांना ओळखत होता. भारतातीलच नव्हे तर परदेशातील सुद्धा अनेक ज्येष्ठ व श्रेष्ठ व्यक्ती त्यांना अत्यादराने वंदन करीत. राष्ट्रपती संजीव रेड्डी तर त्यांचेसमोर हमेशा नतमस्तक होत. अशा या महापुरुषाचा लोभ श्रीसाईलीलावर खूपखूप होता. बाबांच्या विचारसरणीचा प्रचार करणारे श्रेष्ठ दर्जाचे मासिक श्रीसाई-लीलाच होय अशी विचारसरणी त्यांनी श्रीसाईलीला लेखक-कवी संमेलनास खास उपस्थित राहून स्पष्टपणे बोलून दाखविली होती. ते उत्तम प्रकारचे लेखक होते आपले वंदनीय गुरुजी श्री प. पू. नरसिंहस्वामीजी यांचे चरित्र त्यांनी इंग्रजीतून लिहिलेले आहे. स्वामीजी अंतर्ज्ञानी होते. ते जणू बाबांचा अवतारच अशी भक्तांची कायम श्रद्धा होती. भारतातील असंख्य ठिकाणची सभासंमेलने अधिवेशने त्यांच्याच अध्य-क्षीय उपस्थितीत पार पडली आहेत तर कित्येक मंदिरातील बाबांच्या मूर्तीचे अना-वरण त्यांच्याच शुभहस्ते झालेले आहे.

श्रीराधाकृष्ण स्वामीजींच्या प्रथम पुण्यतिथीदिनी त्यांच्याबद्दलच्या असंख्य आठवणींनी आमच्या मनात काहूर उठलेले आहे. हृदय हेलावून गेले आहे आणि म्हणूनच आता आवर घालून आम्ही व्यथित अंतःकरणाने या महापुरुषाला कोटी कोटी प्रणाम करीत आहोत. त्यांच्या प्रथम पुण्यतिथीदिनी होणाऱ्या समारंभास भक्तांनी जातीने हजर राहून त्यांना आदरांजली वहावी असे सुचविण्याशिवाय आता आमच्या हाती आणखीन काय आहे.

# बिट्टू बरा झाला !

श्री. उदय र. पार्सेकर,
बिल्डींग ४७ विंग एफ–९४,
मनीष नगर, अंधेरी (पश्चिम),
मुंबई क्र. ४०० ०५८.

● साईबाबांवर माझी नितांत श्रद्धा आहे. साईबाबांनी आमचे अनेक वेळ संकट निवारण केले आहे. साईबाबा आपल्या भक्तांचे संकट दूर करण्यासाठी सत्वर धावून येतात. साईबाबांच्या कृपेने आज आम्ही कुटुंबातील सर्वजण सुखी व समाधानी आहोत. आज आम्ही जे काही आहोत ती देखील त्यांचीच कृपा म्हणावी लागेल. त्यांच्याच आर्शिवादाने मी ' साईनाथ इलेक्ट्रीकल ' नावाचे लहानसे दुकान देखील उघडले आहे.

अशा या साईनाथांनी आमच्या बिट्टूचे (कुत्रा) प्राण कसे वाचविले त्याचीच हकीकत —

आमच्याकडे बिट्टू नावाचा कुत्रा आहे. दिसायला पांढरा शुभ्र–देखणा– घरात सर्वांचा लाडका व हुशार. नित्य नियमा प्रमाणे सकाळी सहा ते साडे सहा वाजता मी बिट्टूला घेऊन फिरायला गेलो होतो. अचानक एका कुत्र्याने त्याच्यावर झडप घातली व बिट्टूचा कान–पकडला व त्याला फरफटत एका ठिकाणहून दुसरीकडे जाऊ लागला, मी त्या कुत्र्याला हाकलण्याचा प्रयत्न केला तेव्हा कुठे त्याने बिट्टूला सोडला. त्यानंतर लगेच बिट्टूच्या कानातून रक्त व पू येऊ लागला. बिट्टू काहीच खात नव्हता. आम्हाला त्याचे हाल पहावेनात. नंतर त्याला डॉक्टरकडे नेला, डॉक्टरने त्याला पाहून सांगितले की हा कुत्रा जगेल असे वाटत नाही, जर त्याला हॉस्पीटल मध्ये नेला तरच वाचण्याची शक्यता आहे, ते सुद्धा नक्की नव्हे, कारण त्याचा कान संपूर्ण खराब झाला आहे. नंतर डॉक्टरनी त्याला औषध दिले.

मी त्याला घरी घेऊन आलो, डॉक्टरने दिलेली औषधे देखील बिट्टू कानात घालू देईना, मग आमचा धीर सुटला. मला तर वाटले की दोन–चार दिवसात बिट्टू आम्हाला सोडून जाणार.

परंतु माझ्या आईने धीर सोडला नाही, रोज रात्री आई त्याच्या कानात झोपल्यावर बाबांची विभूती घालू लागली त्याच बरोबर औषध देखील परंतु औषध

घातले कि बिट्टू कान झटकायचा व सर्व औषध बाहेर जायचे. मात्र विभूती घातली की कान आतून ओला असल्यामुळे ती कानात घट्ट चिटकून बसायची, असे पाच–सहा दिवस गेले, हळू–हळू कानातून रक्त व पू येण्याचे थांबले व फक्त दहा दिवसाच्या आतच बिट्टू ठणठणीत बरा झाला.

म्हणजे डॉक्टर देखील बिट्टू बद्दल काहिच सांगू शकले नाहीत म्हणजे जगेल किंवा नाही. त्याच आमच्या बिट्टूला साईबाबांनी ठीक केले, त्याचे प्राण वाचविले डॉक्टरांनी लिहून दिलेल्या औषधांनी जे कान ठीक होऊ शकले नाहीत ते साईबाबांच्या विभूतीने ठीक केले. हा मला आलेला ताजा अनुभव आहे.

अशा ह्या साईनाथांची कृपा आमच्या कुटुंबावर राहो हीच साई चरणी प्रार्थना.


श्रीसाईलीलेच्या अठ्ठेचाळीस कवी लेखकांना फोटो परिचय द्वारा प्रत्यक्ष पहाण्याची सुवर्णसंधी

**श्रीसाई गीत दरबार**

[ श्री साईलीलेच्या कवी लेखकांचा प्रातिनिधिक काव्य संग्रह ]

प्रस्तावना– श्री. क. हि. काकरे, न्यायालयधारक
श्री साईबाबा संस्थान शिरडी

शुभाशिर्वाद– डॉ. अण्णासाहेब गव्हाणकर

संयोजक– डॉ. सौ. सुमती खानविलकर
,, कु. इंदूताई नाईक

**किंमत – अवघी ५ रुपये**

श्री साईलीला सातव्या लेखक – कवी संमेलनात शिरडी येथे प्रकाशित होत आहे.

खालील ठिकाणी फक्त ५ रु. पाठवून आपली प्रत घरपोच मिळवा

**श्री. विजय द. हजारे, एम. ए.,**
द्वारा कृपाशू प्रकाशन,
सी/६ गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड,
मु. पो. बोरीवली ( पूर्व ). मुंबई–४०० ०६०

# हे दिनानाथ ! तुझा अवतार अंतरंगी

—कु. निशिकांत दिगंबर पेडणेकर
बी. आय. टी. चाळ नं. २८ शामलदास
गांधी मार्ग, दुसरा माळा खो. नं. ४२
काळबादेवी मुं. नं. ४००००२

'शिरडीस ज्याचे लागतील पाय' टळती अपाय सर्व त्याचे'

आमचे २१ डिसेंबर १९७८ साली शिरडीला जायचे ठरले. तत्पूर्वी माझे आईवडील दोनदा शिरडीला जाऊन आले. माझी परीक्षा असल्याकारणाने मला त्यांनी नेले नव्हते. मला वाटत होते बाबांना कदाचित लहान मुले आवडत नसतील. मोठ्या मंडळींच्या मनात आले की ते पटकन शिरडीला जाऊन येतात. पण आम्हा मुलांना वाटते सदानकदा बाबांकडे जावे. पण प्रत्यक्षात बाबांनाही हे जमणे शक्य नव्हते. म्हणून ते आम्हाला स्वप्नात दर्शन देतात, संकटकाळी धावतात. एकदा असेच एक संकट आमच्यावर आले होते. माझी आई, मोठी बहीण व सर्वात लहान बहीण कपडे खरेदी करण्यास निघाली. जाण्यापूर्वी माझी मोठी बहीण बाबांच्या पाया पडताना म्हणाली बाबा सर्वांची कामे करतात. पण आमचे मात्र काय केले. खरेदी करता करता वाटेत माझी लहान बहीण आईचा हात सोडून कुठच्या कुठे गेली. त्याचा आम्हाला पत्ता लागला नाही. खुप शोधाशोध झाली. बाबांची आळवणी केली. बाबा तुमच्या शिवाय आमचे कोण? नाही तेव्हा तुम्ही माझ्या धाकटया बहिणीला सुरक्षीत घरी आणा. आणि रात्रौ ८–३० च्या सुमारास 'गणेश देसाई' नावाच्या व्यक्तीने आमच्या घरी तिला आणले. घरी आलेली ती व्यक्ती माझ्या वडिलांचे मित्रच निघालें. अशा प्रकारे आम्हाला बाबांनी या संकटातून मुक्त केले. बाबांवर आपली श्रद्धा असावी. त्यांना भक्तीने शरण गेले पाहिजे. मी त्यांची पोथी नेहमी वाचत असे, आणि म्हणूनच गुरुभेटीला माझे मन आतुरलेले पाहूनच की काय बाबांनी तो २१ डिसेंबर १९७८ हा दिवस उजाडला.

त्यादिवशी रात्री ८ ला गाडी सुटली. मला गाडीतही बाबाच समोर दिसत होते. गाडीत वेळ कसा गेला तो मला समजलाच नाही, व आमची गाडी सकाळी ९ ला शिरडीला पोहचली. साईबाबांच्याच कृपेने आम्हाला तावडतोब खोली मिळाली. आम्ही स्नान वगैरे करून देवळात बाबांच्या दर्शनास निघालो. बाबांच्या दारी गेलो आणि तावडतोब बाबांची मूर्ती पाहताच माझे मस्तक नम्र झाले. स्नान आरतीचा सोहळा पाहण्यास आम्हाला मिळाला. मंदिराची आगळीच शोभा, भक्तीभावाचा

तो सोहळा पाहून डोळे दिपून गेले. बाबांची ती लीला पाहून माझा जीव बाबांवर फारच जडला. मंदिरात सदा बाबांचा नामघोष चालू होता. बाबांच्या दारी सर्व पापांचा नाश होतो. भक्तांसाठी सतत बाबा त्याच्या पाठीशी उभे असतात. श्रीसाईबाबांनी आपल्या वास्तव्याने शिरडीचा सर्व परिसर पवित्र, प्रसन्न, समृद्ध व वैभवशाली बनवला आहे. त्यांनी गरिबांना, श्रीमंताना सर्व धर्माच्या व पंथाच्या लोकांनाही त्यांनी जवळ केले आहे. ते आपल्या भक्तांना सांगतात परमेश्वर सगळया चराचरामध्ये भरून उरलेला आहे. त्याच्या इच्छेनुसार जगाचे सर्व व्यवहार चालतात. त्याची लीला अगाध आहे. परमेश्वर तुम्हाला ठेवेल तसे रहा, सद्‌सद्‌विवेकबुद्धी जागृत ठेवा, सत्याचे पालन करा, सचोटीने वागावे, आपआपले कर्तव्य करीत रहावे, कुणाची निंदा करू नका. कुणाशीही भांडू नका, रिकामटेकडे बसून राहू नका. प्रत्येक क्षण क्षण महत्त्वाचा आहे असे समजून वागा. ईश्वर नावाचा जप करा. असा जो वागेल त्याच्या मागे पुढे चोहीकडे ईश्वर उभा असेल.

साईचरणी माझे जवळ जवळ नातेच जडले आता. त्यांनीच माझ्या देहाचे आतापर्यंत सार्थक केले. मी साईनामवीना पोरका म्हणूनच बाबांची इच्छा होती की, मी नाते जोडावे याकरिता त्यांनी माझी भेट शिरडीला घडवून आणली. बाबांची अगाध लीला काय वर्णन करू हेच या बाबांच्या पाडसाला शब्द अपुरे पडतात. पण मला धाडस झाले तेवढे मी बाबांचे वर्णन केले. बाबांनी आपल्या पाडसाला असेच आशीर्वादाने संतुष्ट करून घेत रहावे अशी माझी बाबांकडे प्रार्थना आहे.


हे दीननाथा, देवारूपा, आत्मानंदा, अविनाशी तुझा अवतार अंतरंगी रोमरोमात भरलेला आहे.

## श्रीसाईलीला

### ६० व्या वर्षानिमित्य नवी माहितीपूर्ण लेखमाला

श्री साईबाबा संस्थान शिरडी येथे संस्थानचे विविध विभाग केवळ भक्तांसाठीच आहेत. या प्रत्येक विभागाचा सर्वांगीण असा स्वतंत्र, संपूर्ण सचित्र परिचय भक्तांना करून देण्याचे ठरविले असून ही लेखमाला नव्या वर्षापासून म्हणजे एप्रिल १९८१ पासून सुरू होत आहे. भक्तांना ही लेखमाला निश्चित माहितीपूर्ण व संग्राह्य वाटेल यात संदेह नाही.

# जाधव मास्तरांची महान कलाकृती !
# श्री शिरडी संस्थानला मयुर रथाची भेट!



कलामहर्षि जाधव मास्तरांनी तयार केलेला मयूर रथ अध्यक्ष श्री भाऊसाहेब वर्तक, मयुर रथाचे उदघाटक बॅ. बाबासाहेब पाटील मधे जाकीट घातलेले जाधव मास्तर

---

महिला कला मंदिर, मुंबईचे संचालक श्री. डी. के. जाधव मास्तर यांनी श्री साईबाबांचा बिलोरी कांचानी अलंकृत केलेला नेत्रदिपक असा मयुर रथ शिरडी येथे श्री बाबांच्या चरणी अर्पण करण्याचा समारंभ रविवार ता. २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी शिरडी येथे पार पडला.

श्री साईबाबांनी दृष्टांत दर्शन देऊन श्री. जाधव मास्तरांना, 'तुझ्या कलाकृतीचा कळस म्हणून तू मयूर रथ निर्माण करशील व माझ्या दर्शनाला येणारी देशोदेशीची जनता शिर्डीला त्या रथाचेही दर्शन घेईल !' असे सांगितले.

बाबांच्या या दृष्टांतामुळे श्री. जाधव मास्तर यांनी सर्वांग सुंदर असा मयूर रथ निर्माण करण्याचा संकल्प सोडला; व असंख्य अडचणीतून अखेर रथ साकार झाला.

मुंबईतील साईभक्तांना त्यांचे दर्शन व्हावे म्हणून श्री. जाधव मास्तरनी ठाणे येथील प्रसिद्ध संत श्री. गजानन महाराज पट्टेकर यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन केले. त्यावेळी 'गुरुप्रसाद, कलानगर बांद्रा, (पूर्व) येथे सहास्रावधी स्त्री पुरुषांनी या रथाचे दर्शन घेतले व मास्तरांच्या साई भक्तीची आणि त्यांच्या कलेची मुक्त मनाने प्रशंसा केली.

हा रथ अठरा फुटी आहे. त्याला दोन श्वेतवर्णीय अबलख घोडे जोडले आहेत. रथावर एकसष्ट पणत्या लावल्या आहेत. त्या बाबांच्या एकसष्टाव्या जयंतीच्या निदर्शक आहेत. रथाच्या दोन्ही अंगाला एकूण चार मयुर आहेत. रथावर सारथी बसला असून रथात बाबांचे भक्त शिरोमणि श्री. म्हाळसापती बसले असून ते बाबांना नमस्कार करीत आहेत.

रथ बिल्लोरी काचांनी सजविला असून हा रथ मोठा नयन मनोहर व प्रेक्षणीय आहे.


मुंबईहून हा रथ तीन ट्रक्स मधून शिर्डीला नेण्यात आला, व बाबांच्या समाधी मंदिरा समोरील बगिचात खास काच घर बनवून त्यात बसविण्यात आला आहे.

रविवार दिनांक २ नोव्हेंबर १९८० रोजी सायंकाळी सहा वाजता, महाराष्ट्र राज्याचे विधी व न्याय मंत्री बॅरिस्टर श्री. बाबासाहेब भोसले यांच्या हस्ते हा रथ अर्पण समारंभ पार पडला.

सुरुवातीला श्री. जाधव मास्तर यांनी बाबांच्या समाधीची शास्त्रोक्त पूजा करून बाबांना शाल अर्पण केली त्या नंतर मयुर रथाची पूजा नियोजित उद्घाटक श्री बाबासाहेब भोसले यांच्या हस्ते पार पडली या नंतर हा समारंभ श्री. भाऊसाहेब वर्तक माजी मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.



बॅ. बाबासाहेब भोसले मयुर रथ कोर्टरिसिव्हर श्री. काकरे साहेबांना अर्पण करीत असताना मधे जाधव मास्तर



डॉ. बाबासाहेब भोसले मास्तरांचा सत्कार करीत असताना शेजारी कोर्ट रिसिव्हर श्री. काकरे साहेब

समारंभाचे प्रास्ताविक भाषण शिर्डी संस्थानचे कोर्ट रिसिव्हर श्री क. ही. काकरे साहेब यांनी केले.

त्यानंतर बाबांचे वेळचे यांचे जुने भक्त म्हाळसापतींचे चिरंजीव श्री. मार्तण्ड भगत, श्री नाना साहेब रासने, श्री अमृत पाटील यांना श्रीफळ व शाल अर्पण करू त्यांचा सत्कार करण्यात आला.

शिर्डी संस्थानने श्री. जाधव मास्तर यांचे कोडकौतुक करून व अशा कलावंताला दीर्घायुष्य लाभो व उत्तरोत्तर त्यांच्या हातून महाराष्ट्राची शान व मान वाढवणाऱ्या कलाकृती घडाव्यात अशी सदिच्छा व्यक्त करून मास्तरांना श्रीफळ व शाल बाबांच्यातर्फे दिली.

यानंतर अध्यक्ष श्री. भाऊसाहेब वर्तक यांचे भाषण झाले. या समारंभाला त्यांच्या पत्नी सौ. वर्तकही उपस्थित होत्या.

अध्यक्षांच्या भाषणानंतर श्री. बाबासाहेब भोसले यांचे भाषण झाले व त्यांनी मयुर रथ शिर्डी संस्थानला अर्पण केला असे जाहीर करून रिसिव्हर श्री. काकरे साहेब यांच्या ताब्यात तो दिला.

या प्रसंगी शिर्डी संस्थानतर्फे श्री. काकरे साहेब यांनी पाहुण्यांची, निमंत्रितांची जी चोख व्यवस्था ठेवली होती त्याबद्दल अध्यक्षांसह सर्वांनी प्रशंसोद्गार काढले.

आभार प्रदर्शन महिला कला मंदिराचे सेक्रेटरी श्री. जी. ए. चव्हाण यांनी केले.

# शिरडी–वृत्त माहे ऑक्टोबर सन १९८०

## दसरा–उत्सव

या महिन्यात श्रीसाईबाबांची पुण्यतिथी, उत्सव असल्यामुळे श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी बाहेरगावाहून येणाऱ्या साईभक्तांची गर्दी बरीच होती. सालाबादप्रमाणे उत्सव मोठ्या थाटात साजरा झाला. दसराउत्सव १ ला दिवस : शनिवार दि. १८-१०-८० रोजी पहाटे ५ वाजता मंदिर उघडल्यावर ५–१५ वा काकड आरती सुरू झाली. आरती संपल्यावर ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधि-मंदिरातून गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय वाचनास सुरुवात झाली. समाधि मंदिरातील नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ पर्यंत ह. भ. प. भास्करराव घैसासबुवा बी. ए. बी. टी., पुणे यांचे कीर्तन झाले. सायंकाळी धूपारती झाल्यावर ७-३० ते ९ पर्यंत व ९-३० ते ११ पर्यंत श्रीविश्वनाथ-बुवा बागूल रेडिओस्टार मुंबई यांचे सुश्राव्य गायन झाले. रात्रौ ९-१५ ते ११-३० पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

दसरा उत्सवाचा मुख्य दिवस : रविवार दि. १९-१०-८० रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५-१५ वा. काकड आरती झाली. नंतर ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थानमार्गे समाधि मंदिरात आली. नित्य-कार्यक्रमा व्यतिरिक्त सकाळी ९ ते १२ पर्यंत भिक्षाझोळी कार्यक्रम झाला. कोर्ट रिसीव्हर श्री. क. हि. काकरे यांनी स्वतः झोळी घेऊन उपस्थीत साईभक्तांना झोळया दिल्या, मंदिरात समाधि, मूर्तीचे दर्शन झाल्यावर झोळी मिरवणूक द्वारकामाईतून गावात गेली. शिरडी गावात घरोघरी भिक्षेसाठी गेल्यावर सुवासिनींनी श्रींच्या निशाणाची पूजा आरती करून भिक्षा झोळीत गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, फळे, नारळ पैसे अशी भिक्षा यथाशक्ति अर्पण करून प्रसाद घेतला. सकाळी १०-३० ते १२ पर्यंत श्रींचे पुण्यतिथी कीर्तन ह. भ. प. भास्करराव घैसासबुवा यांनी केले. त्यानंतर माध्यान्ह आरती झाली व तीर्थप्रसाद वाटणेत आला. दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत श्रींची आराधना विधी कार्यक्रम श्री. क. हि. काकरे कोर्ट रिसीव्हर यांचे-हस्ते झाला. यजमान म्हणून त्यांनी पुरोहिताना धोतर, उपरणे, सुवासिनींना खण व सेवेकऱ्यांना धोतर, कापड दिले.

सायंकाळी ५ वा. सीमोल्लंघन मिरवणूक वाजत गाजत खंडोबाचे देवळाजवळ गेली. त्या ठिकाणी श्रींच्या निशाणाची व शमीचे पूजन झाल्यावर सोने लुटण्याचा कार्यक्रम झाला. धार्मिक पूजाविधी कार्यक्रम कोर्ट रिसिव्हर श्री. क. हि. काकरे यांनी केला. खंडोबा देवाचे दर्शन घेतल्यावर गावातील सर्व देवळात जाऊन उपस्थित लोकांनी देवतांचे दर्शन घेतले. त्यानंतर मिरवणूक मंदिरात आली व धूपारती झाली.

रात्रौ ७.३० ते ८.३० पर्यंत मुंबईतील सुप्रसिद्ध श्रीकृष्ण बँडपथक परेल, भोईवाडा यांच्या बँड वादनाचा कार्यक्रम झाला. ९.१५ वाजता श्रींच्या रथाची भव्य मिरवणूक गावातून निघाली होती. सनई, चौघडा सिंगवादन, डफ, बँडपथके टाळ-मृदंगच्या गजरात मिरवणूक गुरुस्थानजवळ आली. तेथे भारुड गारुड कार्यक्रम झाले. पुण्याचे नकलाकार श्री. रघुनाथराव सांडभोर व शिरडीचे श्री. तुकाराम परदेशी यांनी निरनिराळे वेष धारण करून करमणूक केली. त्यानंतर मिरवणूक १२-३० ला मंदिरात आली व सर्वांनी कलाकारांचे हजेरीत भाग घेतला. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले होते. दसरा उत्सव ३ रा दिवसः- सोमवार दि. २०-१०-८० रोजी पहाटे ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. गुरुस्थान ठिकाणी सकाळी ७-३० ते ८-३० पर्यंत रुद्राभिषेक झाला. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंत ह. भ. प. लक्ष्मणबुवा बाकचौरे, शिरडी यांचे प्रवचन झाले. व धुपारतीनंतर कु. चारुशिला बेलसरे रेडिओस्टार, मुंबई यांचे गायनाचा कार्यक्रम झाला. दसरा उत्सव ४ था दिवसः- मंगळवार दि. २१-१०-८० रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५-१५ वा. काकड आरती झाली. ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी १०-३० ते १२ वाजेपर्यंत, संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांचे कालाकीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर माध्यान्ह आरती झाली व भक्तांना तीर्थप्रसाद वाटणेत आला. रात्रौ ७-३० ते ९ वाजेपर्यंत संत उपासनी महाराज आश्रम साकुरी येथील कन्याकुमारींच्या भजनाचा कार्यक्रम झाला. नंतर १० वाजेपर्यंत कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या व शेजारती होऊन उत्सव समाप्त झाला.

**कोजागिरी पौर्णिमा** :- गुरुवार दि. २३-१०-८० रोजी सायंकाळी धुपारती झाल्यानंतर डॉ. के. बी. गव्हाणकर व मंडळी मुंबई यांचे गायनाचे कार्यक्रम सुरू झाले. रात्रौ ७-३० ते ९ वाजेपर्यंत गायनाचा कार्यक्रम झाल्यानंतर ९-१५ ते १० पर्यंत गुरुवारची पालखी झाली. १० ते १२ पर्यंत सौ. पद्मजा र. सहस्रबुद्धे यांचे कीर्तन झाले. ११ ते १२ वाजेपर्यंत कोर्टरिसिव्हर श्री. क. हि. काकरे यांनी श्रींच्या समाधीची पूजा व चंद्रपूजा केल्यावर उपस्थित भक्तमंडळींना दूध, पोहे प्रसाद वाटण्यात आला. १२ ते सकाळी ५ वाजेपर्यंत डॉ. गव्हाणकर व मंडळीने करमणुकीचे कार्यक्रम केले.

**हवापाणी** :- शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पहाटे हवेत गारवा असतो.

काही कलाकारानी श्री.च्या पुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणेः-

**कीर्तन**—१) संस्थान गवई श्री. ग वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमी प्रमाणे झाली.

२) ह. भ. प. श्री. भास्करराव घैसासबुवा पुणे यांचे किर्तन.

३) ह. भ. प. सौ. पद्मजा र. सहस्त्रबुद्धे मुंबई यांचे कीर्तन.

**प्रवचन**— १) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे शिर्डी.

२) ह. भ. प. रघुनाथ कृष्ण कारखानीस पुणे.

**भजन, गायन, वगैरे—**

१) भोर इंडस्ट्रीज भजनी मंडळ. भोर. २) सर्वश्री विलास शंकरराव भोसले, सोलापूर. ३) मधूकर तुकाराम घुमाळ, मुंबई. ४) सौ. वत्सलाबाई नाडकर्णी, दादर मुंबई. ५) मधूसुदन दत्तात्रय गौतम, माटुंगा मुंबई. ६) बळीराम सुखराम शंभरकर, ७) सौ. शोभना म. जावळे, विलेपार्ले. ८) त्रिलोकी भोला मंडळ, ग्वाल्हेर. ९) यल्ल प्रगाध रामचंद्रराव हैद्राबाद. १०) ॐनाट्यगंधा मच्छींद्र नवनाथ कांबळी, ११) रमेशचंद्र लक्ष्मण रणदिवे, मुंबई. १२) गंगाराम म. गवाणकर, मुंबई. १३) अंचमा हैद्राबाद. १४) श्रीराम व्ही. सातर्डेकर, मुंबई. १५) विश्वनाथ बागूल, मुंबई. १६) ह. भ. प. शिवगोंडा बाळगोंडा मु. शंकनपाडे पाटील, कोल्हापूर. १७) भोलानाथ समेळ, मुंबई. १८) रावसाहेब देशमुख, अमरावती. १९) विष्णू गोविंद थोरात, पुणे. २०) कुमार रघुवीर शांताराम मिराणे, शिर्डी. २१) रामानंद स्वामी बेल्लोरी. २२) ज्ञानेश्वर वैद्य, शिर्डी. २३) रघुनाथ बाबूराव सांडभोर, पुणे. २४) सौ. कमल रघुनाथ सांडभोर, पुणे. २५) सौ. विमल बाबूराव पुरोहीत, शिर्डी. २६) श्री. जगन्नाथ महादेव गणाचार्य, मुंबई. २७) सौ. सविता सुरेशराव गिजरे, शिर्डी. २८) सौ. प्रमिला मनोहर जोशी, नासिक. २९) सौ. नंदिनी सुभाष पाटील, गोरेगाव. ३०) श्री. नामदेव नागू भोईर, नवघर. ३१) हरकचंद चंद्रभान रुणवाल ओलेगाव. ३२) सौ. नीला विष्णू प्रभू, मुंबई. ३३) सखाराम राघोजी सालकर, कोपरगाव. ३४) दत्तात्रय काशीराम टक्के, मुंबई. ३५) विष्णू भगवंत शेणवीभोबे, गोवा. ३६) ह. भ. प. शुक्लेश्वर महाराज भोर्वीस. ३७) श्यामसुंदर भेडा, संगमनेर. ३८) कु. सुहासिनी कोल्हटकर शिर्डी. ३९) नारायण आसराजी क्षीरसागर चिकलठाणा. ४०) अरुणराव खानवीलकर, इंदौर. ४१) सी. बी. प्रसाद हैद्राबाद. ४२) कु. मीराबाई शिर्डी. ४३) अनंत हरीशेठ दळी, मुंबई. ४४) श्रीमती सरोज शुक्ला ४५) कु. मनोरमा प्रतापनारायण वाजपेयी, ४६) प्रकाश विष्णुपंत ठोसर, बलसाड. ४७) दत्तात्रय दामोदर रासने, पुणे. ४८) बाबूराव सुंदर नवर, नंदूरबार. ४९) आनंदगिरी गोसावी, संगमनेर. ५०) ज्ञानोबा तात्याबा वाडेकर, शिरडी. ५१) बाळा पिलाजी गुरव, शिरडी. ५२) श्रीधर पुंडलिक सोनार, हडपसर. ५३) कु. मणी सिताराम शिरडी. ५४) गजानन नारायण पाटील, पनवेल. ५५) श्रीकृष्ण बॅण्डपथक मुंबई. ५६) कु. चारुशीला बेलसरे, ठाणे. ५७)

विलास महाडीक मुंबई. ५८) दिवाकर सावंत मुंबई. ५९) सत्यवान वि. मालाडकर ६०) रमाकांत मिरगळ, मुंबई. ६१) वसंत कामते, मुंबई. ६२) रघुनाथ नागरे, शिर्डी. ६३) शांताराम मिराषे, शिरडी. ६४) सुकदेव शांताराम नांदवीकर, मुंबई. ६५) विलास परळकर, मुंबई. ६६) बाबूराव नेर, मुंबई. ६७) विनायक जाधव, मुंबई. ६८) नागेश चुरीया, शिर्डी. ६९) सौ. जयश्री सुधीर थत्ते, उज्जैन. ७०) आप्पा सामंत, दादर. ७१) मारोतीबुवा बागडे, मुंबई. ७२) कु. भगवान मारुती बागडे, ७३) मारुती विठ्ठल पवार, ७४) नाथा जाधव, ७५) विठ्ठल घाटगे, ७६) शाहीर मधुकर मोरे, ७७) पांडुरंग कदम, मुंबई, ७८) तुकाराम सोळकर, ७९) जीवन तळाशीकर, ८०) गोविंद पागडे, ८१) बाळ चावरे, मुंबई. ८२) सौ. सुशीला मा. बागडे, ८३) सौ. सुनिता व. कांबळे, ८४) रोहीदास हरीश्चंद्र मसूरकर, ८५) सुखदेव कांबळी, ८६) विलास बिर्टे, ८७) विनायक लाड, ८८) रामदास पाटील, ८९) दत्ता मोरे, ९०) दिलीप मोरे, ९१) सदानंद कखेकर, ९२) एकनाथ घनवटे, ९३) नामदेव केणी, ९४) रामचंद्र थोबाटे, ९५) यशवंत मोरे, ९६) भूषण गवाणकर, ९७) राम खळदकर, पुणे. ९८) श्याम खळदकर, ९९) महादेव तुपे, १००) विनायक देवळणकर, १०१) ज्ञानेश्वर नगरकर, १०२) कन्याकुमारी आश्रम साकोरी, १०३) शशीकांत पुसाळकर, मुंबई. १०४) नरहरी रामचंद्र कवीश्वर, इंदौर. १०५) ह. भ. प. विजयबाबा नागपूर. १०६) कु. भार्गवी आचार्या, हैद्राबाद. १०७) पांचाळ अनंत दत्तराम, १०८) वसंत दत्तात्रय फुलंब्रीकर, मुंबई. १०९) दामूअण्णा महादेव दळवी, ११०) अशोक दामूअण्णा दळवी, श्रीरामपूर. १११) सुभाष विठ्ठल नरसाळे, ११२) निवास सुब्रम्हण्यम चेंबूर. ११३) बनवाले नाथ गोसावी, ११४) राकेशचंद्र जैन, मुंबई. ११५) मोहमद जाफर शेख, श्रीरामपूर. ११६) डॉ. बी. के. मितल, मीरत.

॥ श्रीदत्तमहाराज प्रसन्न ॥

सोन्याची शुद्धता आणि सुबक व कलात्मक दागिने

तयार करणारी एकमेव विश्वासार्ह पेढी—

मे. शंकर हरी वैद्य (रत्नागिरीकर)

आणि कुष्टे ज्युवेलरर्स

पाठारे मॅन्शन, ले. ज. रोड, सिटीलाईट सिनेमा जवळ,

माहीम, मुंबई – ४०० ०१६

# शिरडीचे श्रीसाईबाबा

## चरित्र आणि चमत्कार

[ लेखक—श्री सच्चिदानंद, प्रकाशक—श्री. अरविंद र. तेंडुलकर, वसंत बुकस्टॉल हनुमान मंदिरासमोर, न. चिं. केळकर मार्ग, दादर, मुं. २८. पृष्ठे २२४, किंमत २२ रु. ] संत चुडामणि भगवान श्रीसाईबाबा यांचे जेवढे उपलब्ध आहे तेवढे पण आटोपशीरपणे लिहिलेले चरित्र या ग्रंथात दिलेले आहे. त्याचप्रमाणे श्रीसाईबाबांनी आपल्या हयातीत केलेले चमत्कार, त्यांच्या सहवासात आलेली, रमलेली भक्तमंडळी, बाबांचे अजब योग सामर्थ्य ही ग्रंथातील प्रकरणे तर पुन्हा पुन्हा वाचाविशी वाटतात. बाबांच्याबद्दल भक्ताने वाचावे तितके थोडेच. त्या मजकुराची गोडी काही अवीटच असते, आणि म्हणूनच की काय या सुंदर संग्राह्य ग्रंथातील अल्ला हो अकबर, सुसंस्कृत साईबाबा, गूढ भाषा, ब्रह्मनिर्वाण, श्रीबाबांची शिकवण ही प्रकरणे तर भाविकांचे लक्ष विशेषत्वाने वेधून घेतात. ग्रंथात प्रसंगास अनुरुप अशी चित्रे आणि सहवासातील प्रसिद्ध व्यक्तींची चित्रे टाकता आली असती तर ग्रंथ आणखीन आकर्षक ठरला असता. टाईप चांगला वापरला असल्याने मुलांनासुद्धा हे पुस्तक वाचनीय असेच आहे इतकेच नव्हे तर प्रत्येक साईभक्ताने हा ग्रंथ संग्रही ठेवावा अशी आमची शिफारस आहे.

# साहित्य चिंतन

[ संपादिका—सौ. रेखा महांबरे, ४।९४ न्यू हनुमान बिल्डिंग, १६ किलन लेन, लॅमिंग्टनमार्ग, मुंबई ७ किंमत ४ रु. ]

मराठीत नव्यानेच सुरू झालेल्या या मासिकाचा शुभारंभ अंक श्रीसाईबाबा विशेषांक म्हणून प्रसिद्ध करण्यात आला असून तो साईधाम येथील बाबांच्या नवीन मूर्ती प्राण प्रतिष्ठा समारंभ प्रसंगी साईभक्तांच्या हाती पडला. या अंकात प्रा. र. दा. गोसावी, प्रा. एकनाथ आव्हाड, सदानंद चेंदवणकर, चंद्रकांत सामंत, गं. गो. सामंत, सूर्यकांत गर्जे, सौ. आशा इंगळे, विजय हजारे इ. मान्यवर लेखकांचे बाबांच्या विषयीचे लेख व योगेश्वर अभ्यंकर, प्र. अ. पुराणिक, शांताराम नेरुरकर, अवेरे, तळेकर इ. कवींच्या कविता असा भरगच्च वाचनीय मजकूर देण्यात आला आहे. मुखपृष्ठावर साईबाबांचे बहारदार संग्राह्य चित्र देण्यात आले आहे. अंकात अजूनही कल्पकता व योजकता असावी तसेच नाविण्यपूर्ण मजकूर द्यावा. या नूतन मासिकास श्री साईबाबांच्या हार्दिक शुभेच्छा प्रविष्ठ.

—साईनंद